


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक ११६ * नांदेड * रविवार, दि. ३ मे २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# बारावीच्या निकालात मुलीच हुश्शार; नांदेडचा ७७.७० टक्के निकाल, १५ टक्क्यांची घसरण

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षेचा निकाल शनिवार दिनांक २ मे रोजी ऑनलाईन जाहीर करण्यात आला. यात जिल्ह्याचा ७७.७० टक्के निकाल लागला असून यंदा निकालाची टक्केवारी १५ टक्क्याने घसरली आहे. ही बाब चिंतेची असले तरी कॉपीमुक्त अभियानाचा हा परिणाम असल्याचे बोलल्या जात आहे. यावर्षीही मुलींनीच बाजी मारली आहे. जिल्ह्यात सर्वाधिक निकाल अर्धापूर तालुक्याचा तर सर्वात कमी कंधार तालुक्याचा निकाल लागला आहे.



नांदेड जिल्ह्यातील एकूण ४० हजार ५२३ विद्यार्थी फेब्रुवारी २०२६ मध्ये झालेल्या इयत्ता १२ वी परीक्षेसाठी प्रविष्ट झाले होते. त्यातील ३१ हजार ४८९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. जिल्ह्यात ४१ हजार ६० विद्यार्थ्यांनी बारावी परीक्षेसाठी नोंदणी केली होती. त्यातील ४० हजार ५२३ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. यामध्ये मुलांची संख्या २१ हजार ७४३ तर मुलींची संख्या १८ हजार ७८० इतकी होती. यात १५ हजार ८९० मुली बारावी परीक्षा उत्तीर्ण झाल्या आहेत तर १५ हजार ५९९ मुले उत्तीर्ण झाले आहेत.

नांदेड जिल्ह्यात यंदा बारावी परीक्षेत विज्ञान शाखेचा ८८.८२ टक्के, वाणिज्य शाखेचा ७०.६४ टक्के, वोकेशनल ६६.७४ टक्के आणि कला शाखेचा ६०.११ टक्के निकाल लागला आहे.

नांदेड जिल्ह्याचा तालुका निहाय निकाल लक्षात घेतला तर सर्वाधिक ९४ टक्के निकाल हा अर्धापूर तालुक्याचा लागला आहे. सर्वात कमी ६३.१६ टक्के निकाल कंधार तालुक्याचा लागला आहे. नांदेड तालुक्याचा ८३.७१ टक्के, भोकर ८२.२८, बिलोली ८८.९४, देगलूर ६३.६२, धर्माबाद ७८.६३, हदगाव ७२.९५, हिमायतनगर ७८.६४, किनवट ७९.५०, लोहा ६५.२६, माहूर ७५.०२, मुखेड ८२.७२, मुदखेड ९१.४२, नायगाव ७७.७५ टक्के आणि उमरी तालुक्याचा ८६.६८ टक्के निकाल लागला आहे.

### राज्याचा ८९.७९ टक्के निकाल

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने बारावीचा निकाल जाहीर केला असून राज्याचा एकूण निकाल ८९.७९% लागला आहे. यंदाही विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांनी बाजी मारली असून या शाखेचा निकाल सर्वाधिक ९६.४४% लागला आहे, तर कला शाखेचा निकाल सर्वात कमी ७८.०२% नोंदवण्यात आला आहे. एकूण १२.८६ लाख विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेतलेल्या बारावी परीक्षेचा निकाल प्रसिद्ध केला आहे. या परीक्षेमध्ये विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी करत ९६.४४ टक्के निकालासह राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. राज्याचा एकूण सरासरी निकाल ८९.७९ टक्के लागला आहे.

# वाजेगाव येथील सरपंच शेख जमील पोलीस कोठडीत

## ग्रामपंचायतीमधील २ कोटी ८४ लाखांच्या भ्रष्टाचाराचे प्रकरण

**नांदेड (प्रतिनिधी)–** तालुक्यातील वाजेगाव ग्रामपंचायतीचे सरपंच शेख जमील अहेमद याच्यासह तत्कालीन ग्रामसेवकांविरुद्ध तब्बल २ कोटी ८४ लाख रुपयांचा शासकीय निधीचा भ्रष्टाचार केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी सरपंचाला अटक केली आहे. त्याला न्यायालयाने दोन दिवसांच्या पोलीस कोठडीत पाठवले आहे. तत्कालीन दोन ग्रामसेवकांचीही नावे आरोपींमध्ये आहेत.

वाजेगाव येथील तक्रारदार लतीफ खान पीरखान पठाण (वय ४०, व्यवसाय पत्रकार, रा. वाजेगाव) यांनी पोलिसांत दिलेल्या फिर्यादीनुसार, सरपंच शेख जमील अहेमद यांनी २०१० पासून आजतागायत सरपंचपदावर राहून वेळोवेळी ग्रामसेवकांच्या मदतीने शासकीय निधीचा गैरवापर व अपहार केला. विशेष म्हणजे, २०१६ मध्ये मयत व्यक्तीच्या नावाने बँकेतून रक्कम काढण्यापासून ते धनादेशाच्या सहाय्याने करोडो रुपयांचा अपहार करण्यात आल्याचा आरोप आहे.

फिर्यादीनुसार, शेख हुसेनाबी शेख मस्तान या महिलेचा मृत्यू ११ एप्रिल २०१६ रोजी झाला असताना, तिच्या नावे ६ ऑगस्ट २०१६ रोजी १२ हजार रुपये उचलण्यात आले. तसेच ग्रामपंचायतीच्या डीसीबी बँकेतील खात्यातून सरपंचांनी स्वतःच्या नावे १ लाख ४४ हजार व १ लाख ५६ हजार अशी दोन वेगवेगळी रक्कम २०१५ मध्ये काढल्याचेही फिर्यादीत म्हटले आहे. याशिवाय रोजंदारीवर काम करणाऱ्या शेख हनीफ यांच्या नावे १४ लाख २० हजार ७०० रुपये धनादेशाच्या सहाय्याने वटवून दलित वस्ती सुधारणेच्या नावे निधी वापरल्याचे दाखविले असले, तरी त्याचा कोणताही लेखाजोखा नसल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

तत्कालीन उपसरपंच शेख मेहबुब यांनी सरपंच व ग्रामसेवकांच्या कारस्थानाला विरोध केला असता, त्यांना फसविण्यासाठी १ फेब्रुवारी २०१९ रोजी १० हजार रुपये त्यांच्या खात्यात टाकण्यात आले आणि शासकीय निधीचा दुरूपयोग केल्याचेही फिर्यादीत स्पष्ट करण्यात आले आहे. या एफआयआर मध्ये शेख जमील अहेमद अमीर हमजा (सरपंच), एस.एस. बोथीकर (ग्रामसेवक), एस. एस. देशमुख (ग्रामसेवक) आणि इतर ज्यांची नावे माहित नाहीत असे आरोपींमध्ये नमूद आहेत.

या प्रकरणाची चौकशी तत्कालीन विस्तार अधिकारी डी. एस. बच्छाव यांनी केली असून, त्यांनी १९ नोव्हेंबर २०१९ रोजी सादर केलेल्या अहवालात सरपंच व ग्रामसेवकांनी पैशाचा अपहार केल्याचा उल्लेख केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

सद्यस्थितीत शेख जमील अहेमद अमीर हमजा (सरपंच) या एका आरोपीला नांदेड ग्रामीण पोलिसांनी अटक केली. शनिवारी शेख जमीलला पोलीस उपनिरीक्षक सुनील भिसे व त्यांच्या सहकाऱ्यांनी न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्याला ३ मेपर्यंत पोलीस कोठडीत पाठवले आहे.

# भोरमध्ये चार वर्षांच्या चिमुरडीवर ६५ वर्षांच्या नराधमाकडून अत्याचार

**पुणे (प्रतिनिधी)–** पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर गावात चार वर्षांच्या चिमुकलीवर ६५ वर्षांच्या नराधमाकडून लैंगिक अत्याचार करून तिची निर्घृणपणे हत्या करण्यात आली. या घटनेनंतर शनिवारी गावात कडकडीत बंद पुकारण्यात आला होता.

ग्रामस्थांनी नराधमाला फाशीची शिक्षा द्या अशी मागणी केली आहे, नाहीतर आरोपीला आमच्या हाती द्या, आम्ही त्यांचं काय करायचं ते बघून असं म्हणत ग्रामस्थांनी घटनेवर संताप व्यक्त केला आहे.

या प्रकरणामुळे गावातील वातावरण तापलं असून पोलीस आणि ग्रामस्थांमध्ये बाचाबाची झाल्याची माहिती समोर आली आणि त्यानंतर ग्रामस्थ आक्रमक झाल्याचा पाहायला मिळाले. आमदार शंकर मांडेकर देखील या ठिकाणी दाखल झाले आहेत, तर या घटननेबाबत पुणे ग्रामीणचे पोलिस अधीक्षक संदीपसिंग गिल यांनी माहिती दिली.

# मालेगावात भरदिवसा चोरांनी दुकानातून सोन्याची बॅग पळविली

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील मालेगाव येथे भरदिवसा चोरांनी दुकानातून सोन्याची बॅग पळविण्याची घटना घडली. या घटनेने व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

अर्धापूर तालुक्यातील मालेगावात शिवशक्ती ज्वेलर्सचे मालक सचिन उडानशिव हे आपले दुकान उघडून मंदीरात गेले होते. त्यांच्या वडीलांनी दुकानात सोने-चांदी असलेली बॅग ठेवली व ते झाड-झुड करत होते. यावेळी पाळत ठेऊन असलेल्या अज्ञात चोरट्यांनी त्यांच्याकडील सोने-चांदीचे दागिने असलेली बॅग घेऊन पळ काढला. या बॅगेत अंदाजे ५ ते ६ लाख रुपयांचे दागिने होते. चोरटे वसमतमार्गे दुचाकीवरून फरार झाले. स्थानिक नागरिक आणि पोलिसांनी फिल्मी स्टाईलने त्यांचा पाठलाग केला, परंतु भररस्त्यात पोलिसांना चकवा देण्यात चोरटे यशस्वी झाले. घटनेची माहिती मिळताच पोलीस पथकाने घटनास्थळी भेट दिली व सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली असून पुढील कारवाई सुरू आहे. तपासणी सुरू आहे.




# महिला टी-२० विश्वचषकासाठी भारतीय संघ जाहीर

**मुंबई (प्रतिनिधी)–** बीसीसीआयने १२ जून २०२६ पासून सुरू होणाऱ्या २०२६ च्या महिला टी-२० विश्वचषकासाठी भारतीय महिला संघाची घोषणा केली. या स्पर्धेपूर्वी बीसीसीआयच्या मुख्यालयात एक बैठक झाली होती. १५ सदस्यीय भारतीय संघाच्या कर्णधारपदी हरमनप्रीत कौरची नियुक्ती करण्यात आली आहे, तर स्मृती मंधानाला उपकर्णधारपद देण्यात आले आहे.

नंदिनी शर्माच्या नावाने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला. या २४ वर्षीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर पदार्पण न केलेल्या गोलंदाजाचा विश्वचषक संघात थेट समावेश करण्यात आला. नंदिनीने महिला प्रीमियर लीगमध्ये दिल्ली कॅपिटल्सकडून खेळताना १० सामन्यांत १७ विकेट्स घेत चांगली कामगिरी केली होती.

भारताचा महिला टी-२० मधील पहिला सामना १४ जून रोजी पाकिस्तानविरुद्ध होणार आहे. महिला टी-२० विश्वचषक आतापर्यंत नऊ वेळा खेळला गेला आहे.

**भारतीय संघ**

हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मानधना (उपकर्णधार), शफाली वर्मा, जेमिमाह रॉड्रिग्स, भारती फुलमाली, दीप्ती शर्मा, रिचा घोष, श्री चरणी, यास्तिका भाटिया, नंदिनी शर्मा, अरुंधती रेड्डी, रेणुका ठाकूर, क्रांती गौड, श्रेयंका पाटील, राधा यादव.

## अवैध व्यवसाय विरोधी मोहिम

# नांदेड परिक्षेत्रात पहिल्या दिवशी २५ गुन्हे दाखल, ४८ जणांविरूद्ध कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड परिक्षेत्रात अवैध व्यवसाय विरोधी मोहिम राबवत २५ गुन्हे दाखल करत ४८ इसमांविरूद्ध कारवाई करण्यात आले आहे.

पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी, दि. १ ते ३१ मे, २०२६ दरम्यान, नांदेड परिक्षेत्रात अवैध दारू, गुटखा, मटका, जुगार, अंमली पदार्थ, घातक शस्त्रे इत्यादी विरोधी मोहिम राबविण्याचे निश्चित केले असून, याबाबतच्या सविस्तर सूचना, दि. २८ एप्रिल रोजी परिक्षेत्रातील सर्व अधिकाऱ्यांना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

सदर मोहिमेच्या पहिल्या दिवशी नांदेड परिक्षेत्रात, महाराष्ट्र जुगार कायद्याअंतर्गत २७ इसमांविरुद्ध कारवाई करून त्यांच्याविरुद्ध ७ गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यांच्याकडून ९७ हजार ५२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तर, अवैध दारू विक्री करणाऱ्या १७ आरोपींविरुद्ध १६ गुन्हे दाखल करून, त्यांच्याकडून २६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर कारवाई सोबतच, शस्त्र अधिनियम व कोटपा अधिनियमाप्रमाणे प्रत्येकी एक अशा एकूण २५ कारवाया करण्यात आल्या असून, यात निष्पन्न झालेल्या आरोपीतांकडून १ लाख २४ हजार ४०६ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**'खबर' हेल्पलाइनची मोठी मदत :** अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलिसांना देता यावी, या दृष्टिकोनातून, पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाने ९१ ५० १०० १०० हा मोबाईल क्रमांक असलेली 'खबर' नावाची हेल्पलाइन सुरू केली असून, नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, सदर क्रमांकावर फोन करून अथवा व्हॉट्सअॅप मेसेजद्वारे पाठवावी, असे आवाहन करण्यात आले होते. सदर हेल्पलाइनवर नागरिकांनी विश्वास दर्शविला असून, परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांच्या निर्मूलनासाठी सदर हेल्पलाईनची मोठी मदत होत असल्याचे, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी स्पष्ट केले आहे.

# जनगणना २०२७ ची नांदेड शहरात स्व-गणनेचा शुभारंभ

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारताची पहिली डिजिटल जनगणना (जनगणना २०२७) करण्याच्या दृष्टीने शनिवार दि. २ एप्रिल रोजी नांदेडमध्ये महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या महापौर कविता मुळे आणि पालिका आयुक्त डॉ.महेशकुमार डोइफोडे यांनी स्वतःची माहिती ऑनलाइन नोंदवून शहरात 'स्व-गणना' मोहिमेचे उद्घाटन केले.




सदरील स्व-गणनेची सुविधा १ मे ते १५ मे या कालावधीत उपलब्ध असेल. नागरिकांना कोणत्याही प्रगणकाची (Enumerator) वाट न पाहता स्वतःच्या कुटुंबाची माहिती सरकारी पोर्टलवर सुरक्षितपणे भरता यावी, हा या मोहिमेचा उद्देश आहे. नागरिकांनी अधिकृत जनगणना पोर्टलवर जाऊन आपली माहिती भरायची आहे. माहिती यशस्वीरित्या भरल्यानंतर एक SE ID (Self-Enumeration ID) जनरेट होईल, जो जतन करून ठेवणे आवश्यक आहे. या मोहिमेच्या पुढील टप्प्यात ज्या नागरिकांनी स्व-गणना केली नाही, त्यांच्या घरी १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत प्रगणक प्रत्यक्ष भेट देऊन माहिती संकलित करतील.

याप्रसंगी बोलताना महापौर कविता मुळे यांनी आवाहन केले की, नांदेडकरांनी या पहिल्या डिजिटल जनगणनेत उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवावा. स्व-गणनेमुळे वेळेची बचत होईल आणि अचूक माहिती संकलित करण्यास मदत होईल. विकासाच्या नियोजनासाठी जनगणना अत्यंत महत्त्वाची असल्याने प्रत्येक नागरिकाने आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे.

**पालिका आयुक्तांचे आवाहन**

त्याचप्रमाणे जनगणनेची आकडेवारी ही भविष्यातील शहर नियोजन, पायाभूत सुविधा, पाणीपुरवठा आणि आरोग्य व्यवस्था यांच्या आराखड्याचा पाया असते. त्यामुळे प्रत्येक कुटुंबाने आपली माहिती पूर्णतः सत्य आणि अचूक भरावी, असे आवाहन पालिका आयुक्त डॉ.महेशकुमार डोइफोडे यांनी केले आहे.




# संगीता डक, विठ्ठल पाटील आणि गिरीधरसिंह ठाकूर भाजपात



**नांदेड (प्रतिनिधी)–** महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या माजी सभापती संगीता विठ्ठल पाटील डक, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक विठ्ठल पाटील डक आणि गिरीधरसिंह ठाकूर यांनी भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला.

खा. अशोकराव चव्हाण व प्रभारी सुनील राणे यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. त्यांच्या प्रवेशामुळे नांदेडमध्ये भाजपाचे संघटन अधिक मजबूत होईल, असा विश्वास खा. अशोकराव चव्हाण यांनी यावेळी व्यक्त केला.

याप्रसंगी महानगराध्यक्ष अमरनाथ राजूरकर, प्रदेश उपाध्यक्ष चैतन्यबापू देशमुख, विजय येवनकर, विजय गंभीरे, प्रवीण साले उपस्थित होते.

# आज नीट युजी २०२६ परिक्षा

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** वैद्यकीय अभ्यासक्रमातील उच्च शिक्षणासाठी आवश्यक असणारी देशव्यापी स्पर्धा परीक्षा नीट युजी २०२६ रविवार, ३ मे २०२६ रोजी देशव्यापी केंद्रांवर दुपारी २ ते ५:२० या वेळेत आयोजित केली जाणार आहे. या परीक्षेसाठी २२.७९ लाखांहून अधिक उमेदवारांनी नोंदणी केली आहे. ही परीक्षा ऑफलाइन (म्हणजेच पेन आणि पेपर मोडमध्ये) पध्दतीने देशभर एकाच वेळी होणार आहे.

नॅशनल टेस्टिंग एजन्सीने (एनटीए) कडक सुरक्षा, ड्रेस कोड आणि बायोमेट्रिक हजेरीचे नियम जारी केले आहेत. गैरप्रकार टाळण्यासाठी झिरो लीक पॉलिसी लागू केली आहे.

# भाजप महिला उत्तर जिल्हाध्यक्षपदी मंगाराणी अंबुलगेकर



**नांदेड–** जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा मंगाराणी अंबुलगेकर यांची भारतीय जनता महिला मोर्चाच्या नांदेड उत्तर जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना नियुक्तीचे पत्र खा. अशोकराव चव्हाण आणि नांदेडचे भाजप प्रभारी तथा माजी आमदार सुनील राणे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

# संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील ज्वलंत गाथा : भीमाबाई दांगट



परवाच आपण सर्वांनी १ मे हा दिवस साजरा केला. हा दिवस आपण महाराष्ट्र दिन म्हणून साजरा करतो, कारण याच दिवशी (१ मे १९६०) स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. स्वातंत्र्यानंतर भारतात राज्यांची पुनर्रचना भाषावार करण्यात येत होती. त्या वेळी मुंबईसह महाराष्ट्र एकत्र असावा, अशी मराठी जनतेची मागणी होती. पण मुंबईला वेगळे ठेवण्याचा किंवा गुजरातमध्ये समाविष्ट करण्याचा विचार पुढे आला. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्र चळवळ उभी राहिली. या चळवळीत शेकडो कार्यकर्त्यांनी, स्त्रियांनी आणि सामान्य लोकांनी मोठा संघर्ष केला; अनेकांनी बलिदानही दिले. या दीर्घ आंदोलनानंतर अखेर १ मे १९६० रोजी मुंबईसह महाराष्ट्र हे स्वतंत्र राज्य निर्माण झाले. त्याच दिवशी गुजरात हेही स्वतंत्र राज्य तयार झाले.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत महिलांनी दिलेले योगदान अत्यंत महत्त्वाचे आणि प्रेरणादायी होते. मुंबईसह महाराष्ट्र स्वतंत्र राज्य व्हावे, मराठी माणसाच्या हक्कांना न्याय मिळावा आणि अन्यायकारक राजकीय निर्णयांना विरोध व्हावा, या उद्देशाने या महिलांनी लढा दिला. मुंबई गुजरातमध्ये जाण्याच्या निर्णयामागील आर्थिक व राजकीय डावपेच त्यांनी ओळखले होते, त्यामुळे आपल्या अस्तित्वासाठी आणि स्वाभिमानासाठी त्यांनी संघर्ष करण्याचा निर्धार केला. हा लढा त्यांनी अत्यंत धैर्याने आणि अहिंसक मार्गाने दिला. सत्याग्रह, मोर्चे, निदर्शने, घोषणा देणे, पोलिसांचा लाठीमार व अश्रुधुराचा सामना करणे, तसेच अटक होऊन तुरुंगवास भोगणे अशा विविध प्रकारे महिलांनी सक्रिय सहभाग घेतला. अनेक महिलांनी घराची जबाबदारी सांभाळत, लहान मुलांना सोबत घेऊनही आंदोलनात भाग घेतला. काही महिलांनी नेतृत्व करत सत्याग्रहाच्या तुकड्या उभारल्या, तर काहींनी सामान्य कार्यकर्त्या म्हणून मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. त्यांच्या या संघर्षामुळे आंदोलनाला व्यापक स्वरूप मिळाले आणि ते अधिक तीव्र झाले.

या चळवळीत सहभागी झालेल्या महिलांमध्ये तारा रेड्डी, सुमन संजगरी, प्रमोदिनी तारे, सुनंदा देसाई, निर्मला कुलकर्णी, पुष्पा त्रिलोकेकर, शालिनी राजूत, विमलाबाई बागल, होसाताई व गोजर पाटील, मालिनीबाई तुळपुळे, कमलताई भागवत, प्रमिला दंडवते, गोदावरी परुळेकर, अहिल्या रांगणेकर, शांती रानडे, अनसूया लिमये, प्रेमा पुरव, अवाबेन देशपांडे, जिजाबाई देशमुख, पार्वतीबाई भोर, प्रेमलताकी चव्हाण, अनुसयाबाई शिंदे, प्रा. आशा तारेस्कर, मालतीबाई तेंडुलकर, प्रा. चारुशीला गुप्ते, अंजलीबाई मगार अशा अनेक महिलांचा समावेश होता.

या सर्व महिलांनी निःस्वार्थपणे, जीवाची पर्वा न करता, आपल्या कुटुंबियांची जबाबदारी बाजूला ठेवून महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी संघर्ष केला. त्यांच्या त्यागामुळेच संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती शक्य झाली. मात्र, दुर्दैवाने त्यांच्या योगदानाची नोंद इतिहासात अपेक्षेइतकी झालेली नाही. तरीही, त्यांच्या या लढ्यामुळे स्त्रीशक्तीची जाणीव समाजाला झाली आणि त्यांच्या त्यागाला सदैव अभिवादन केले जाते.

महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासात अनेक कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांनी आपले अमूल्य योगदान दिले आहे. या तेजस्वी परंपरेतील एक महत्त्वपूर्ण नाव म्हणजे भीमाबाई दांगट. भीमाबाई दांगट या पुणे जिल्ह्यातील वेल्हे येथे सखारामराव पवार यांच्या कन्या होत्या. त्यांचे माहेर वेल्हे (जि. पुणे) येथेच होते. त्यांचा विवाह पुण्यातील श्रीमंत व दानशूर व्यक्ती गंगाराम दांगट यांच्याशी झाला होता, ज्यांना 'श्रीमंत शेठ' म्हणून ओळखले जात असे. परंतु त्यांच्या सुखी संसाराला अचानक दुःखाचा धक्का बसला. गंगाराम दांगट यांचे अकाली निधन झाले. त्या वेळी भीमाबाई सहा महिन्यांच्या गरोदर होत्या. पुढे त्यांनी मुलगा सदाशिव याला जन्म दिला. पतीच्या निधनानंतरही त्यांनी धैर्य न गमावता मुलाचा सांभाळ केला आणि कुटुंबाची सर्व जबाबदारी समर्थपणे पार पाडत आयुष्याची वाटचाल ठामपणे सुरू ठेवली.

स्वातंत्र्य चळवळ, सातारच्या प्रतिसरकाराला दिलेले सहकार्य, संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातील सक्रिय सहभाग आणि समाजसेवेतील त्यांचे कार्य यामुळे त्या एक खऱ्या अर्थाने 'रणरागिणी' ठरतात. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात अनेकांनी आपल्या परीने योगदान दिले; परंतु काहींचे कार्य विशेष उठून दिसते. सातारा येथे स्थापन झालेल्या सातारा प्रति सरकार (प्रतिसरकार) हा भारतीय स्वातंत्र्यचळवळीतील एक अनोखा प्रयोग होता. या प्रतिसरकाराला भीमाबाई दांगट यांनी वेळोवेळी आर्थिक व नैतिक मदत केली.

त्यांच्या या योगदानाची दखल प्रतिसरकारमधील नेत्यांनी नेहमीच घेतली. त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली जात असे. विशेषतः लोककलावंत शंकर निकम यांनी आपल्या पोवाड्यांमधून भीमाबाईंच्या त्यागाची आणि कार्याची कथा लोकांसमोर मांडली. त्यातील एक प्रसंग विशेष लक्षवेधी आहे. पुण्यातील मंडई परिसरात शाहीर निकम पोवाडा सादर करत असताना त्यांनी स्वातंत्र्य चळवळीसाठी मदतीचे आवाहन केले. तेव्हा उपस्थित असलेल्या भीमाबाईंनी क्षणाचाही विलंब न करता आपल्या अंगावरील दागिने काढून दिले. हा प्रसंग त्यांच्यातील देशभक्तीची आणि दानशूरतेची साक्ष देतो.

स्वातंत्र्यानंतरही भीमाबाईंचा संघर्ष थांबला नाही. मराठी भाषिक राज्याच्या निर्मितीसाठी उभ्या राहिलेल्या संयुक्त महाराष्ट्र चळवळ मध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेतला.मुंबई, बेळगाव, निपाणी, कारवारसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे या घोषणांनी वातावरण भारावून गेले होते. या लढ्यात सर्व विरोधी पक्ष एकत्र येऊन 'संयुक्त महाराष्ट्र समिती' स्थापन झाली आणि १९५७ मध्ये निवडणुका लढवून जनतेचा कौल घेतला गेला.त्या काळात काँग्रेसच्या भूमिकेमुळे जनतेमध्ये असंतोष होता. परिणामी काँग्रेस नेत्यांना अनेक ठिकाणी रोषाला सामोरे जावे लागत होते. अशाच एका प्रसंगी तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण पुण्यात आले असता भीमाबाई दांगट यांनी त्यांना काळे झेंडे दाखवून निषेध व्यक्त केला होता. त्यांनी केवळ आंदोलनात भाग घेतला नाही, तर संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर ठाम भूमिका घेत नगरसेवक पदाचा राजीनामा दिला. पदापेक्षा तत्त्व महत्त्वाचे मानणाऱ्या त्यांच्या या निर्णयाने त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची उंची अधोरेखित होते. पुण्यातील अनेक आंदोलनांमध्ये त्या आघाडीवर होत्या, त्यामुळे त्यांना 'रणरागिणी' म्हणून ओळख मिळाली.

भीमाबाई दांगट यांचे कार्य केवळ राजकारणापुरते मर्यादित नव्हते. त्या एक संवेदनशील आणि समाजाभिमुख व्यक्तिमत्त्व होत्या. त्यांनी आयुष्यभर गरजूंना मदत केली, त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी प्रयत्न केले.

त्यांच्या दानशूरतेचे एक उल्लेखनीय उदाहरण म्हणजे पुण्यातील गणेश पेठ येथील स्वतःचा वाडा त्यांनी शाळेसाठी दान दिला. या जागेवर मुलींची शाळा उभी राहिली, ज्यामुळे अनेक मुलींना शिक्षणाची संधी मिळाली.त्या काळात महिलांच्या शिक्षणासाठी अशा प्रकारचे योगदान अत्यंत मोलाचे होते. त्यांच्या या कार्यामुळे समाजात शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित झाले. त्यांची प्रेरणा अनेकांना मिळाली.


भीमाबाई दांगट या पुणे महानगरपालिकेच्या पहिल्या महिला नगरसेविका होत्या. त्या काळात महिलांचे राजकारणातील प्रमाण अत्यल्प होते, अशा परिस्थितीत त्यांनी पुढे येऊन नेतृत्व केले.पुण्यातील उपेक्षित, कष्टकरी वर्गाचा आवाज बनून त्यांनी त्यांच्या समस्या मांडल्या. त्यांनी लोकांच्या हितासाठी काम करताना कोणत्याही अडथळ्यांची पर्वा केली नाही.त्यांच्या निर्णयक्षमतेमुळे आणि धाडसी वृत्तीमुळे त्या पुण्याच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात एक प्रभावी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखल्या जात.

आज भीमाबाई दांगट यांच्या निधनाला अनेक वर्षे लोटली आहेत. काळाच्या ओघात त्यांचे कार्य आणि योगदान काही प्रमाणात विस्मरणात गेले आहे. त्यांचा वैभवशाली कार्यकाल पाहणारी पिढीही आता उरलेली नाही.ही बाब निश्चितच खंतजनक आहे की, ज्या व्यक्तीने पुण्याच्या आणि महाराष्ट्राच्या इतिहासात महत्त्वपूर्ण योगदान दिले, त्यांचे स्मरण आज कमी प्रमाणात होते. परंतु त्यांच्या कार्याचा विचार केला तर ते आजच्या समाजासाठी अत्यंत प्रेरणादायी आहे. समाजकारण आणि राजकारणात कार्य करणाऱ्यांसाठी त्यांचे जीवन एक आदर्श मार्गदर्शक आहे.

भीमाबाई दांगट यांचे जीवन हे त्याग, संघर्ष, धैर्य आणि समाजसेवेचे अद्वितीय उदाहरण आहे. स्वातंत्र्य चळवळीत दिलेले योगदान, प्रतिसरकाराला केलेली मदत, संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातील सहभाग आणि समाजासाठी केलेले कार्य यामुळे त्या इतिहासात अजरामर झाल्या आहेत. त्यांचे कार्य केवळ इतिहासापुरते मर्यादित न ठेवता, त्यातून प्रेरणा घेऊन आजच्या पिढीने समाजासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा नक्कीच घेतली पाहिजे. भीमाबाई दांगट यांसारख्या व्यक्तिमत्त्वांचे स्मरण म्हणजे केवळ भूतकाळाची उजळणी नसून भविष्याची दिशा दाखवणारा मोठा आधारस्तंभ आहे.

**-डॉ. दीपाली पांडे देशमुख,**
पू. अहिल्यादेवी होळकर
महाविद्यालय, राणी सावरगाव

# समाजव्यवस्थेतील नैराश्यावर उपाय म्हणजे भारत सातपुतेचे 'जागरण'




पुस्तक परीक्षण
यादवपुत्र रमेश मुनेश्वर
किनवट
मो. ७५८८४२४७३५

आत्मकथन परखडपणे लिहिणे हे ही एक आव्हानाच असते. ते आवाहन भारत सातपुते यांनी चांगले पेललेले आहेत. मुळात 'जागरण' करणाऱ्या सर्वसामान्य गोंधळी समाजाच्या घरात लेखकाचा जन्म झाला. हा जन्म रात्रभर 'जागरण' करण्यात न घालवता लेखक समाज जागृतीसाठी पुढाकार घेऊन अनेक पुस्तके लिहून, अनेक व्याख्यान देत महाराष्ट्रभर फिरतात. हा सारा बदल शिक्षणाने झाल्याची कबुलीही ते देतात. जीवनात अनेक चढ-उतार आले तरीही न डगमगता धैर्याने तोंड देणे हेच आपले कर्तव्य आहे याची शिकवणूक जणू ते या पुस्तकातून देतात. सुपारी घेऊन 'जागरण' करण्यापेक्षा पुस्तकं वाचून माणुसकीचे 'जागरण' करणे किती महत्त्वाचे आहे.

अपयश किंवा संकटांमुळे खचून न जाता, ध्येयाकडे कसे वाटचाल करावे, याचा वस्तुपाठ हे पुस्तक नव्या पिढीसमोर मांडते. जागरण' या आत्मचरित्राबद्दल अजून काही खास गोष्टी अशा आहेत की, हे पुस्तक केवळ एका व्यक्तीचा इतिहास नाही, तर तो एका सामाजिक परिवर्तनाचा दस्तऐवज आहे. लेखकाने स्वतःच्या आयुष्यातील यशासोबतच आपल्या चुकलेल्या गोष्टींची आणि संघर्षाची प्रामाणिक कबुली दिली आहे. ही पारदर्शकता वाचकाला लेखकाशी भावनिकरीत्या जोडते.

मी ही शिक्षण क्षेत्रात असल्यामुळे ही कादंबरी वाचताना अनेक घटनांशी जुळतांना दिसत होतो. प्रशासनाचे अनुभव वाचतांना अनेक प्रसंग डोळ्यापुढे येत होते. गावकऱ्यांची वेगवेगळी व्यक्तिरेखेचा कादंबरीत उल्लेख असला तरी प्रत्येक गावाचे प्रतिनिधीत्व करताना दिसतात. शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, शिक्षणविस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका किंवा खिचडी शिजवणारा कामगार, शाळेचा सेवक कांदबरीत सत्य घटना असल्या तरी त्या व्यक्तिरेखा सर्वत्र दिसतात. म्हणून 'जागरण' भारत सातपुतेचे आत्मकथन जरी असले तरी ते वाचताना शिक्षण क्षेत्रातील अनेक शिक्षकांच्या जीवनाशी निगडित असल्याने ते 'लोकार्मय' झालेले आहेत.

'सुट्टीविनाश शाळा' वार्षिक स्नेहसंमेलन, स्वंयशासन दिन, वृक्षारोपण, शैक्षणिक सहली, रात्रशाळा, सकाळचा योगा, असे शाळेत राबित असलेल्या विविध उपक्रमाने ते नेहमी चर्चेत राहिलेले आहेत. तसेच खोटा गुन्हा, निलंबन, आजार, यावर मात करून राज्य पुरस्कारपर्यंत मजल मारणारे लेखक भारत सातपुते अनेक पुस्तकाचे आणि पुरस्काराचे धनी आहेत.

लेखकाने शिक्षण क्षेत्रात काम करताना भ्रष्टाचार आणि चुकीच्या प्रवृत्तींविरुद्ध जो लढा दिला, तो वाचकांना प्रेरणा देणारा आहे. या पुस्तकात मराठवाड्यातील बोलीभाषेचा गिचलीय, नादर, मुदी, फुफुटात सुंदर वापर केला आहे, ज्यामुळे ग्रामीण लोकजीवनाचा अनुभव अधिक जिवंत होतो. केवळ स्वतःच्या यश न सांगता, समाजव्यवस्थेतील नैराश्य आणि त्यावरील उपाय यावर हे पुस्तक भाष्य करते. भारत सातपुते यांचे 'जागरण' हे आत्मचरित्र म्हणजे केवळ एका व्यक्तीचा जीवनप्रवास नसून, तो एका प्रामाणिक कार्यकर्त्याचा आणि शिक्षकाचा 'सत्यशोधाचा प्रवास' आहे. हे आत्मचरित्र लेखकाच्या गरिबीतील संघर्षाचा आलेख मांडते.

# श्रद्धा, अंधश्रद्धा आणि भोंदूगिरी : विवेकाची कसोटी

भारतीय संस्कृती ही ज्ञानाची आणि विचारांची जननी मानली जाते. आपल्या संस्कृतीचा पाया आस्था आणि श्रद्धा यांवर आधारलेला असला, तरी आजच्या काळात या संकल्पनांच्या आड अंधश्रद्धा आणि भोंदूगिरी यांनी आपले पाय पसरले आहेत. या गुंतागुंतीच्या प्रवासात स्वतःचा मार्ग शोधण्यासाठी विवेक हीच एकमेव कसोटी आहे.

**ऐकीव माहिती विरुद्ध**
**स्व-अध्ययन: मूळ फरक**

बहुतेकदा आपण धर्माबद्दल किंवा शास्त्रांबद्दल जे काही जाणतो, ते ऐकीव असते. कोणाकडून तरी ऐकणे आणि स्वतः वाचणे यात जमीन-अस्मानाचा फरक असतो. जेव्हा आपण स्वतः एखादा ग्रंथ वाचतो, तेव्हा त्यातील शब्द आणि आपले मन यांचा थेट संवाद होतो. दुसऱ्याकडून ऐकताना आपल्याला जे मिळते, ते मूळ ज्ञान नसून त्या व्यक्तीने त्याच्या बुद्धीनुसार काढलेला निष्कर्ष असतो. प्रत्येक सांगणारा आपल्या सोयीनुसार व्याख्या करतो, ज्यामुळे मूळ संदेश बाजूला राहतो.

**स्वतः वाचणे शक्य नसेल,**
**तर किमान सावध राहा**

आजच्या धावपळीच्या युगात प्रत्येकालाच मूळ ग्रंथ सविस्तर वाचणे शक्य होईलच असे नाही. अशा वेळी एक महत्त्वाची खबरदारी घेणे आवश्यक आहे. कोणी काही सांगतोय म्हणून त्यावर डोळे झाकून विश्वास ठेवणे चुकीचे आहे. जर तुम्हाला स्वतःला वाचन करणे शक्य नसेल, तर किमान समोरची व्यक्ती जे सांगतेय ते तर्काच्या कसोटीवर तपासून पाहा.

केवळ कुणीतरी भगवी वस्त्रे घातली आहेत म्हणून आपले मस्तक त्याच्या चरणी ठेवणे म्हणजे स्वतःच्या बुद्धीचा अपमान आहे. जे ज्ञान तुम्हाला गुलाम बनवते किंवा तुमच्या मनात भीती निर्माण करते, ते कधीही शास्त्रशुद्ध असू शकत नाही.

**शारीरिक आणि मानसिक शिस्त:** योग, प्राणायाम आणि ध्यान केवळ बौद्धिक वाचन पुरेसे नसते, तर त्या ज्ञानाला पचवण्यासाठी शरीर आणि मन खंबीर असावे लागते. जर आपण आपल्या दैनंदिन जीवनात योग,



प्राणायाम, व्यायाम आणि ध्यानधारणेची जोड दिली, तर बरेच प्रश्न आपोआप मार्गी लागतात.

**ध्यान (Meditation):** ध्यानामुळे मनाची एकाग्रता वाढते आणि विचारांमधील गोंधळ दूर होतो. यामुळे आपल्याला खरे आणि खोट यातील फरक समजण्याची शक्ती मिळते.

**प्राणायाम आणि व्यायाम:** जेव्हा शरीर सुदृढ असते, तेव्हा मनही उत्साही राहते. शरीरातील सकारात्मक ऊर्जेमुळे आपण कोणत्याही बाह्य भीतीला किंवा अंधश्रद्धेला बळी पडत नाही.

**आत्मबळ:** योगसाधनेमुळे आंतरिक शक्ती जागृत होते, ज्यामुळे आपल्याला मानसिक शांतीसाठी कोणत्याही भोंदू व्यक्तीच्या पाया पडण्याची गरज उरत नाही.

**भोंदूगिरीला अज्ञानाचे खतपाणी**

समाजात भोंदूगिरी फोफावण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे आपली मानसिक असहायता. आपण स्वतः शोध घेण्याचे किंवा साधना करण्याचे कष्ट घेत नाही आणि मग कुणीतरी चमत्का करून प्रश्न सोडवेल या आशेने फसवले जातो. अज्ञानाचा हा पडदा फाडण्यासाठी चिकित्सक वृत्ती आणि स्व-साधना हेच सर्वात मोठे शस्त्र आहे.

**विवेकाची कसोटी कशी लावावी?**

कोणतीही गोष्ट स्वीकारण्यापूर्वी स्वतःला हे प्रश्न नक्की विचारा: १. हे माणुसकीला धरून आहे का? (कोणाचे नुकसान होत असेल, तर ती श्रद्धा नाही.) २. याला तर्काचा आधार आहे का? (केवळ कुणीतरी सांगितले म्हणून विश्वास ठेवू नका.) ३. हे मला निर्भय बनवते की भयभीत? (खरी श्रद्धा आणि साधना नेहमी धीर देते, भीती नाही.)

**निष्कर्ष:** स्वतःचा दिवा स्वतः व्हा (अप्प दीपो भव) भारतीय संस्कृतीतील महान वारसा समजून घेण्यासाठी आपल्याला मध्यस्थांची गरज लागता कामा नये.

दुसऱ्याच्या डोळ्यांनी जग पाहण्यापेक्षा स्वतःच्या विवेकाने सत्य शोधणे केव्हाही श्रेष्ठ. जेव्हा आपण स्वतः ग्रंथ वाचू आणि त्याला योग-साधनेची जोड देऊ, तेव्हा आपल्याला मिळणारा बोध हा आपल्या आयुष्यातील संकटांवर मात करण्यासाठी प्रकाश दाखवेल.

तुमचे वाचन हेच तुमच्या विवेकाची ढाल आहे, तुमची साधना हे तुमचे आत्मबळ आहे आणि तुमची चिकित्सक वृत्ती ही तुमच्या आत्मसन्मानाचे रक्षणकर्ती आहे. या सर्वांचा मेळ घातला, तरच भोंदूगिरीचा अंधार कायमचा दूर होईल.

**-रोहित विलासराव भोसीकर**
संचालक : भोसीकर फुड्स
मो. ८८०५५७५५५५

## बळ

चहुबाजुंनी
संकटाने घेरलेलं असते
म्हणून जेव्हा कधी
खचून खाली बसतो
त्या वेळला
कुठेच काही दिसत नाही
अशावेळी
डोळ्यावर अंधारी येते
मस्तक गुंगायला लागते
शंतता पसरलेली दिसते सगळीकडे
आशेचा किरण सुद्धा
मावळेला दिसतो
त्या क्षणाला वाटतं आता करावं?
कारण हातबल झालेला असतो
तेवढ्यात
स्वतः ला थोडे सावरून घेतो
शंभुराजांच्या
इतिहासातला
एखादा प्रसंग आठवुण घेतो
मग, खाडकण
उठून उभा ठाकतो
बुलंद होतात बाहू
मस्तकात ताडकण वीज चमकते
तेव्हा कोंडलेल्या वाटेवरचं पाणी
हळूहळू निस्तरायला लागते
बाजुला होतात काटे
अन समोर
जळालेल्या संकटाची राख दिसते
राजांच्या चरणी
न कळत मुजऱ्याला मान झुकते
अन् आपोआप अंगात बळ येते

**- गोविंद कवळे**
इळेगाव ता. उमरी जि. नांदेड
मो. ७३८७२६७२१९

## शाळा

उघड्यावर भरली,
मुलांची शाळा
शाळेत आला,
काळा कावळा
कावळा म्हणाला,
मित्र माझा फळा
मुलांनो तुम्ही,
छान चित्र काढा
खडूने ओढल्या,
वेड्यावाकड्या रेघा
रेघांची झाली,
छान चित्र बघा!

**-प्र. श्री. जाधव**
नांदेड
मो.८८०५८३६२०७

## अस्तित्वाच्या खुणा ठेवूनी..!

अस्तित्वाच्या खुणा ठेवूनी
पुरून उरावे विश्वात,
तुला भेटण्या नवा जन्म हा
व्हावा सुगंधी फुलात.
तुझ्या मौनाचे अर्थ निराळे
कधी न मला कळले,
ओठावरचे गुपित
ओठावरतीच विरले.
काळजातले हळवे स्पंदन तुझ्यावरती भुलले,
काय करावे सांग मी
मनास समजावून हरले.
ओढ अशी ही अविरत
भूल तुझी जडली,
तू प्राजक्ताचा दहिवर ओला
मी धुंद वेडी अबोली.
मी जन्मावे ऋतू होऊनी
तू व्हावा ऋतूंचा बहर,
अबोल झाल्या शब्दांनाही
मिळावा नव्याने स्वर

**-रुपाली वागरे वैद्य**
नांदेड
मो. ९८६०२८६२४१

## न्यायासाठी लढ...

भोगावे लागते । येथे सारे भोग ।
सुख,दुःख, रोग । याचसाठी ।।
करता सत्कर्म । आनंद मिळेल ।
संकट टळेल । मार्गातील ।।
देतो तेच पुन्हा । मिळते परत ।
म्हणून सतत । कर्म कर ।।
माणुसकीविना । सारे धर्म व्यर्थ ।
टाळण्या अनर्थ । निट वाग ।।
पाषाण बनून । अन्याय पाहणे ।
अन्याय करणे । सम जाण ।।
न्यायासाठी लढ । न्यायासाठी जग ।
संकटाचे ढग । दूर कर ।।
जन्माला आलेला । नक्कीच मरेल ।
सत्कर्म उरेल । तुझे वेड्या ।।
दयाभाव तुझ्या । अंतरी जागव ।
गोविंद माधव । माणसात ।।
अजु सत्य बोल । सत्य धर्म जाण ।
गुप्त कर दान । जिवनात ।।

**-अजय रमेश चव्हाण,**
तरनोळी, ता.दारव्हा, जि. यवतमाळ
मो.८८०५८३६२०७

# जिल्ह्यातील सर्व घटकांच्या विकासासाठी सदैव कटिबद्ध -पालकमंत्री अतुल सावे

## ▸ महाराष्ट्र स्थापनेचा ६७ वा स्थापना दिन उत्साहात साजरा
## ▸ नागरिकांना जनगणना २०२७ मध्ये सहभाग नोंदविण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)** –केंद्र व राज्य शासनाकडून समाजातील सर्व घटकांचा विचार करून विविध कल्याणकारी योजना राबविण्यावर नेहमीच भर आहे. यामध्ये प्रामुख्याने शेतकरी, रोजगार, आरोग्य यासह सर्वांगीण विकासावर विशेष लक्ष केंद्रित केले जात आहे. विकसित भारत २०४७ अनुषंगाने वाटचाल करुन सर्वांगीण विकास व जनकल्याणासाठी कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास व अपारंपरिक ऊर्जा, दिव्यांग सक्षमीकरण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी केले.

महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या स्थापना दिनानिमित्त शुक्रवारी नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते नांदेड येथील पोलीस कवायत मैदानावर सकाळी ८ वा. ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण, महापौर कविता मुळे, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अपर जिल्हाधिकारी रत्नदीप गायकवाड, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर अन्य वरिष्ठ अधिकारी आणि ज्येष्ठ सन्माननीय नागरिक तसेच स्वातंत्र सैनिक व त्यांच्या कुटुंबियांची उपस्थिती होती. यावेळी त्यांनी कामगार दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. ध्वजवंदनाच्या मुख्य कार्यक्रमानंतर पालकमंत्री अतुल सावे यांनी स्वातंत्र्य सैनिक व त्यांच्या वारस पत्नींची भेट घेतली. पालकमंत्र्यांसोबत जिल्हाधिकारी यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.

देशात जनगणना २०२७ चा पहिला टप्पा आजपासून सुरू झाला आहे. या राष्ट्रीय उपक्रमांतर्गत स्व-गणना १ ते १५ मे २०२६ या कालावधीत होणार असून, घरांची नोंदणी १६ मे ते १४ जून २०२६ दरम्यान केली जाणार आहे. जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी या महत्त्वाच्या अभियानात सहभागी होऊन आपली जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन पालकमंत्री अतुल सावे यांनी केले.

यंदाचा 'अर्थसंकल्प' हा विकसित महाराष्ट्राच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण आणि दूरदर्शी पाऊल आहे. हा अर्थसंकल्प राज्याच्या शेतकरी, महिला, युवक, कष्टकरी, सर्वसामान्य नागरिकांना समर्पित आहे. विशेषत: शेतकरी कल्याणाला प्राधान्य देत हा अर्थसंकल्प शेतकऱ्यांच्या जीवनात खरा बदल घडवणारा आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेअंतर्गत रुपये २ लाखांपर्यंतच्या कर्जमाफीची मोठी घोषणा शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने दिलासा देणारी आहे असे त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या सूक्ष्म व



प्रभावी अंमलबजावणीमुळे जिल्ह्याला प्रधानमंत्री पीक विमा योजना (खरीप हंगाम २०२५-२६) अंतर्गत ८१३ कोटी रुपयांचा पीक विमा मंजूर झाला असून, लाभार्थ्यांना विमा रकमेचे वितरण सुरू आहे. वाढत्या तापमानामुळे जिल्ह्यात उष्णतेची लाट (हिट वेव्ह) निर्माण झाली आहे. सर्व नागरिकांनी खबरदारीचा उपाय म्हणून आवश्यक ती काळजी घ्यावी. दुपारी १२ ते ४ या वेळेत कष्टाची कामे टाळावीत. तसेच उष्माघाताची लक्षणे दिसताच तातडीने उपचार घ्यावेत असे आवाहन पालकमंत्री सावे यांनी केले.

भारतीय हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, २०२६ च्या मान्सूनवर 'एल-निनो' या हवामान घटकाचा प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील पशुधनाच्या संरक्षणासाठी व संभाव्य चारा टंचाईवर मात करण्यासाठी 'जिल्हा चारा सुरक्षा आराखडा' तयार करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराज महास्वराज्य समाधान शिबिराच्या माध्यमातून विविध विभागाच्या योजनांचा लाभ नागरिकांना देण्यात येत आहे याबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस हवालदार नागेश देवराव कंकाळ, नागरी हक्क संरक्षण विभागाचे लिंगुराम बळीराम पोकलवार व महिला पोलीस शिपाई जयश्री विठ्ठल मुरकुटे यांचा सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देवून सन्मान करण्यात आला. विभागीय आयुक्त कार्यालयाकडून निवड झालेले आदर्श ग्राम महसूल अधिकारी माधव कोंडजी पाटील यांना ५ हजार रुपयांचा धनादेश व प्रशस्तीपत्र देवून सन्मान केला. महिला व बाल कल्याण क्षेत्रात उत्कृष्ठ कार्य करणाऱ्या समाजसेविकांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जिल्हास्तरीय पुरस्कार सुरेखा किनगावकर, अर्चना झाडबुके यांना प्रत्येकी १० हजार रुपयांचा धनादेश, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देवून सन्मान करण्यात आला. जिल्हास्तरीय युवक-युवती पुरस्कार लवकुश मधुकर जाधव व साधना कैलास गायकवाड यांना प्रत्येकी १० हजार रुपयांचा धनादेश, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रविंद्र पांडागळे व श्रीमती अंजली नातु यांनी केले.

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)** –स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या स्थापना दिनानिमित्त शुक्रवारी उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रम पार पडला. यावेळी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते प्रशासकीय इमारतीसमोरील प्रांगणात राष्ट्रीय ध्वजास मानवंदना देण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात स्वामी रामानंद तीर्थ यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास कुलगुरू डॉ. चासकर यांनी पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर 'वंदे मातरम'चे सादरीकरण करून ध्वजारोहण पार पडले. पुढे राष्ट्रगीत व राज्यगीताचे सादरीकरण करण्यात आले.

या प्रसंगी प्र-कुलगरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, मानव्य विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पराग खडके, आंतरविद्याशाखीय अभ्यास मंडळाचे अधिष्ठाता डॉ. चंद्रकांत बाविस्कर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, वित्त व लेखाधिकारी डॉ. राजेश शिंदे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर, ज्ञान स्रोत केंद्राचे संचालक डॉ. जगदीश कुलकर्णी, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर, क्रीडा विभागाचे संचालक डॉ. भास्कर माने, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मारुती गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी विद्यापीठाच्या प्रगतीचा थोडक्यात आढावा घेत उपस्थितांना महाराष्ट्र राज्य स्थापना दिनाच्या शुभेच्छा दिल्या. ध्वजारोहण कार्यक्रमानंतर विद्यापीठ परिसरामध्ये मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात



आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. राजेंद्र गोणारकर यांनी केले. तसेच क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. भास्कर माने आणि विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. कार्यक्रमास विद्यापीठातील अधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माळाकोळी येथील पाणीपुरवठा योजनेच्या स्टॉक पाईपांना आग

## लाखो रुपयांचे नुकसान, जलजीवन अंतर्गत विविध गावांतील कामांचे पाईप

**लोहा (प्रतिनिधी)** –जलजीवन मिशन अंतर्गत माळाकोळी व परिसरातील विविध गावांमध्ये सुरु असलेल्या पाणीपुरवठा योजनेच्या कामांसाठी माळाकोळी येथे साठवून (स्टॉक) ठेवलेल्या पाईप साठ्याला दि. २९ एप्रिल रोजी दुपारी साडेतीन वाजता अचानक आग लागली. या आगीमध्ये अंदाजे साठ लक्ष रुपयांचे पाईप जळून खाक झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

जलजीवन मिशन अंतर्गत माळाकोळी व परिसरातील विविध गावांमध्ये पाणीपुरवठा योजनेची कामे संतोष कन्स्ट्रक्शन ईन्फ्रा प्रा. लि. या कंपनीच्या माध्यमातून सुरू आहेत. या विविध गावांसाठी लागणाऱ्या पाईपचा साठा माळाकोळी येथील कंधार रोड परिसरातील मोकळ्या जागेत करण्यात आला होता. एसडीपी पाईप असलेल्या या साठ्याला दि. २९ एप्रिल रोजी अचानक आग लागली, यामुळे या ठिकाणी ठेवण्यात



आलेले संपूर्ण पाईप जळून खाक झाले आहेत. उन्हाची तीव्रता व आजूबाजूला असलेली घरे यामुळे आग आटोक्यात आणण्यासाठी नागरिकांनी प्रयत्न सुरू केले. मात्र आग आटोक्यात येत नव्हती. यामुळे सरपंच जनार्धन तिडके व ईतर कार्यकर्त्यांनी लोहा नगरपालिका व कंधार नगरपालिका येथील अग्नीशामक वाहनांना पाचारण केले. यानंतर आग आटोक्यात आली. या आगीमुळे अंदाजे साठ लक्ष रुपयांचे पाईप जळून खाक झाल्याची माहिती संतोष कन्स्ट्रक्शन ईन्फ्रा प्रा. लि. च्या वतीने देण्यात आली आहे. आग नेमकी कोणत्या कारणाने लागली याची माहिती नाही. मात्र उन्हाची तीव्रता जास्त असल्याने आग लागली असावी असा अंदाज आहे.

विविध गावांमध्ये सुरु असलेल्या योजनेचे हे पाईप होते. आगीचे कारण समजले नाही मात्र उन्हाची तीव्रता असल्याने आग लागली असावी, पाईपची जबाबदारी संबंधित कन्स्ट्रक्शन कंपनीची होती, अग्नीशामक वाहन बोलावून आग आटोक्यात आणण्यात आली आहे.

# किनवटच्या तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर यांचा नवी दिल्लीत गौरव

**किनवट (प्रतिनिधी)**– नवी दिल्ली येथे आयोजित पहिल्या अखिल भारतीय महिला शासकीय अधिकारी मराठी साहित्य संमेलनात किनवटच्या तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर यांचा साहित्यातील उल्लेखनीय योगदानाबद्दल विशेष सन्मान करण्यात आला. या संमेलनात त्या निमंत्रित प्रतिनिधी म्हणून सहभागी झाल्या होत्या.

डॉ. चोंडेकर यांनी सादर केलेल्या काव्यमय अभिव्यक्तीने उपस्थितांची मने जिंकली. संमेलनातील बहिणाबाई चौधरी सभागृहात त्यांच्या सादरीकरणाला उत्स्फूर्त दाद मिळाली. प्रशासकीय जबाबदाऱ्या सांभाळत साहित्य क्षेत्रात केलेल्या त्यांच्या कार्याचे विशेष कौतुक करण्यात आले.



छत्रपती महाराणी ताराराणी यांच्या ३५१ व्या जयंती वर्षानिमित्त नवी दिल्लीतील महाराष्ट्र सदन येथे ११ व १२ एप्रिल रोजी 'जागर कर्तृत्वाचा, उत्सव साहित्याचा' या ब्रीदवाक्याखाली हे संमेलन पार पडले. 'सरहद, पुणे' आणि महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागाच्या संयुक्त विद्यमाने या संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

या संमेलनाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी साहित्य मानवी मनाची संवेदनशीलता जिवंत ठेवते, असे सांगत महिला अधिकाऱ्यांनी साहित्य निर्मिती सुरू ठेवण्याचे आवाहन केले. मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी मराठीला डिजिटल माध्यमात बळकटी देण्यासाठी महत्त्वाच्या घोषणा केल्या.

# मूल्यमापन समितीवर पत्रकार गोविंद टेकाळे यांची निवड

**अर्धापूर (प्रतिनिधी)**– शासनाच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत ग्रामपंचायतींच्या कामकाजाचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करण्यासाठी समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीत पत्रकार प्रतिनिधी म्हणून गोविंद टेकाळे यांची निवड करण्यात आली.



ग्राम विकास विभाग महाराष्ट्र शासनाचे आदेश, उप मुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत जिल्हा परिषद नांदेड यांच्या सुचनेनुसार समीती स्थापन करण्यात आली, ही समिती चंद्रपूर जिल्ह्यातील भद्रावती तालुक्यातील ग्रामपंचायतीला समिती प्रत्यक्ष भेट देऊन विकासकामे आणि प्रशासकीय पारदर्शकतेची तपासणी करणार आहे.

# कुंडलवाडी पोलिसांच्या सतर्कतेने विळेगाव येथे बालविवाह रोखला

**कुंडलवाडी (प्रतिनिधी)**– कुंडलवाडी पोलिसांच्या सतर्कते-मुळे धर्माबाद तालुक्यातील विळेगाव येथे होणारा बालविवाह रोखण्यात आला.

मंगळवार, दि. २८ एप्रिल रोजी सायंकाळच्या सुमारास कुंडलवाडी पोलिसांना विळेगाव येथे एका अल्पवयीन मुलीचा विवाह बुधवार, दि. २९ एप्रिल रोजी होणार असल्याची माहिती मिळाली. माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ दखल घेत तहसीलदार सुरेखा स्वामी, गटविकास अधिकारी क्षीरसागर तसेच संबंधित विभागांशी समन्वय साधून संयुक्त पथक तयार केले.

या पथकात बालविवाह प्रतिबंधक अधिकारी, ग्रामविकास अधिकारी, महिला व बालविकास विभागाचे कर्मचारी तसेच कुंडलवाडी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे, पोलीस उपनिरीक्षक गजेंद्र मंजरमकर व इतर कर्मचाऱ्यांचा समावेश होता.

पथकाने दोन्ही कुटुंबांच्या घरी भेट देऊन चौकशी केली असता विवाहाची तयारी सुरू असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर संबंधित पालकांना समज देत बालविवाह हा कायद्याने गुन्हा असल्याची जाणीव करून देण्यात आली. दोन्ही पक्षांना नोटीस देऊन मुलीचे वय १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत आणि मुलाचे वय २१ वर्षे पूर्ण होईपर्यंत विवाह न करण्याबाबत हमीपत्र लिहून घेण्यात आले. तसेच प्रशासनाकडून कुटुंबियांचे समुपदेशन करण्यात आले.

# प्रा. डॉ. प्रमिला इंगोले यांच्या पुस्तकांचे प्राचार्य डॉ. पंजाबराव चव्हाण यांच्या हस्ते प्रकाशन

## 'कायदे साक्षरता' व 'नागरी सेवा' पुस्तके स्पर्धा परीक्षा आणि कायद्याचे ज्ञान मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांना उपयुक्त

**भोकर (प्रतिनिधी)**– येथील दिगंबरराव बिंदू महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाच्या प्रा. डॉ. प्रमिला इंगोले (गावंडे) यांनी लिहिलेल्या 'कायदे साक्षरता' आणि 'नागरी सेवा' या दोन अत्यंत महत्त्वपूर्ण पुस्तकांचा प्रकाशन सोहळा मंगळवार, दि. ३० एप्रिल २०२६ रोजी महाविद्यालयात उत्साहात पार पडला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पंजाबराव चव्हाण यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांना पदवी शिक्षणासोबतच कायद्याचे ज्ञान असणे आणि करिअरच्या संधींची माहिती असणे अनिवार्य झाले आहे. हेच उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून डॉ. प्रमिला इंगोले यांनी या दोन पुस्तकांची निर्मिती केली आहे. ही पुस्तके



प्रामुख्याने बी. ए., बी. कॉम. आणि बी.एस्सी. या वर्गातील विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाला अनुसरून तयार करण्यात आली आहेत.

'कायदे साक्षरता' या पुस्तकात डॉ. इंगोले यांनी अतिशय सोप्या भाषेत कायद्याची माहिती दिली आहे. यामध्ये महिलांविरुद्ध होणारे गुन्हे, अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा, हिंदू व मुस्लीम वैयक्तिक कायदा, एफआयआर व अटक प्रक्रिया, माहिती तंत्रज्ञान कायदा, जनहित याचिका, समान नागरी संहिता आणि सायबर कायदा यांसारख्या ज्वलंत व आवश्यक विषयांचा सखोल समावेश केला आहे. हे पुस्तक केवळ विद्यार्थ्यांसाठीच नव्हे, तर सर्वसामान्यांच्या ज्ञानात भर घालण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.

१२ वी नंतर पुढे काय? असा प्रश्न पडणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'नागरी सेवा' हे पुस्तक दीपस्तंभ ठरेल. यात यूपीएससी, भारतीय नागरी सेवा, लोकसेवा आयोग आणि नागरी सेवांमधील करिअरच्या विविध संधींची सविस्तर मांडणी करण्यात आली आहे.

या प्रकाशन सोहळ्याप्रसंगी प्राचार्य डॉ. पंजाबराव चव्हाण यांच्यासह प्रा. डॉ. व्यंकट माने, प्रा. डॉ. सचिन तावडे, प्रा. डॉ. सतीश चव्हाण, प्रा. मुकुंद येगावकर, प्रा. सचिन तिवडे, प्रा. विलास गावंडे, प्रा. ओमप्रकाश कदम, प्रा. डॉ. भुसारे, प्रा. डॉ. बलखंडे, प्रा. टाके, प्रा. पंकज हाके, प्रा. श्रीमती

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना महानगरपालिकेच्यावतीने अभिवादन



**नांदेड (प्रतिनिधी)**– ग्रामगीतेचे प्रणेते, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त दि. ३० एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता महानगरपालिकेत त्यांच्या प्रतिमेला महापौर कविता मुळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी पालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोइफोडे यांनी सुध्दा तुकडोजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

महानगरपालिकेच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात राष्ट्रसंतांच्या कार्याचे स्मरण करण्यात आले. यावेळी महापालिकेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी समाजप्रबोधनाचे हे कार्य पुढे नेण्याचा संकल्प केला.

यावेळी बोलताना मान्यवरांनी म्हटले की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी आपल्या साहित्यातून व विशेषतः 'ग्रामगीता' या ग्रंथातून ग्रामविकासाचा आणि स्वच्छतेचा जो विचार मांडला, तो आजही तितकाच प्रासंगिक आहे. त्यांच्या या भारतात बंधुभाव नित्य वसू दे या प्रार्थनेतून त्यांनी राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला.

# अन्न भेसळ व औषध गैरप्रकारांवर कठोर कारवाई करा; अ. भा. ग्राहक पंचायतीची प्रशासनाकडे मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरातील हॉटेल, किराणा दुकाने व औषध विक्री केंद्रांमध्ये वाढत्या गैरप्रकारांविरोधात अखिल भारतीय ग्राहक पंचायत, नांदेड जिल्हा शाखेने अन्न व औषध प्रशासनाकडे निवेदन सादर करत तातडीने कठोर उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. नागरिकांच्या आरोग्याशी निगडित असलेल्या या गंभीर प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

निवेदनानंतर ग्राहक पंचायत पदाधिकाऱ्यांनी अन्न व औषध प्रशासनाच्या कार्यालयात भेट देऊन सहायक आयुक्तांशी सविस्तर चर्चा केली. अन्न विभागाचे सहायक आयुक्त चट्टे व औषध विभागाचे सहायक आयुक्त अशोक राठोड यांनी विविध मुद्द्यांवर सुमारे दीड तास सखोल चर्चा करत समस्यांची दखल घेतली. भविष्यात अपेक्षांनुसार कार्यवाही करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. चर्चा सकारात्मक व सहकार्यपूर्ण वातावरणात पार पडल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

निवेदनात हॉटेलमध्ये शिळे अन्न देणे, अस्वच्छ स्वयंपाकघर, निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरणे यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याचे नमूद करण्यात आले. किराणा दुकानांमध्ये अन्न भेसळीचे प्रकार वाढत असल्याचीही चिंता व्यक्त करण्यात आली आहे.

औषध विक्री संदर्भात नियमांचे उघडपणे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आणण्यात आले. डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय औषधांची विक्री, नोंदणीकृत औषधतज्ज्ञाशिवाय व्यवहार, मुदतबाह्य औषधांची विक्री या प्रकारांवर तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. विशेषतः Pregabalin या औषधाची बिनचिठ्ठी विक्री होत असल्याबाबत गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली.

ग्राहक पंचायतीने औषध दुकानांची नियमित व अचानक तपासणी, परवाना व साठा नोंदींची पडताळणी, योग्य साठवणूक, तसेच प्रत्येक ग्राहकाला अधिकृत पावती देणे बंधनकारक करण्याची मागणी केली. याशिवाय बनावट औषधांची प्रयोगशाळेत तपासणी व औषध विक्रीत पारदर्शकता आणण्यासाठी संगणकीकृत व्यवस्था लागू करण्यावर भर देण्यात आला.

तसेच नागरिकांच्या तक्रारींसाठी स्वतंत्र तक्रार निवारण यंत्रणा सुरू करावी व जनजागृती मोहीम राबवून डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषध सेवन टाळावे, असेही निवेदनात नमूद आहे.

जिल्हाध्यक्ष रमेश मस्के, जिल्हा सचिव संतोष कुलकर्णी, जिल्हा सहसचिव अनुजा डोईफोडे व ग्राहक मार्गदर्शन प्रमुख रश्मी वडवळकर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. प्रशासनाने कागदोपत्री मर्यादित न राहता प्रत्यक्ष तपासणी मोहीम राबविल्यास नागरिकांना सुरक्षित अन्न व दर्जेदार औषधे मिळतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# ओ सरकार मायबाप, आमच्या नागरी सुविधांचं काय?

## गॅसबी नाय, पेट्रोल-डिझेलबी नाय, बँकेत कॅश बी नाय, जनतेचा टाहो..!

**शंकरनगर (प्रतिनिधी)**– शंकरनगर परिसरासह जिल्ह्यातील अनेक पेट्रोल पंपांवर मागील दोन दिवसांपासून पेट्रोल व डिझेलचा तीव्र तुटवडा निर्माण झाला असून, नागरीक अक्षरशः त्रस्त झाले आहेत. लग्नसराईच्या पार्श्वभूमीवर ही टंचाई अधिकच गंभीर ठरत आहे.

पंधरा मेपर्यंत सुरू असलेल्या लग्न हंगामामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणावर प्रवास करावा लागत आहे. मात्र पेट्रोल-डिझेल उपलब्ध नसल्याने प्रवास ठप्प झाला असून, अनेक लग्नकार्यांमध्ये अडथळे निर्माण होत आहेत. काही ठिकाणी तर नातेवाईकांना वेळेवर पोहोचता न आल्याने कार्यक्रमांवरही परिणाम होत असल्याची चर्चा आहे.

दरम्यान, गॅस टंचाईमुळे घरगुती स्वयंपाकावर मोठा परिणाम झाला असून, महिलांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. त्यातच बँकांमध्ये रोकड टंचाई असल्याने दैनंदिन व्यवहार ठप्प झाले आहेत. पेट्रोल, डिझेल, गॅस आणि रोकड या अत्यावश्यक गरजांचा एकाच वेळी तुटवडा निर्माण झाल्याने ग्रामीण भागातील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे.

पेट्रोल पंपावर तासन्तास उभे राहावे लागते, तरीही इंधन मिळत नाही. शेवटी रिकाम्या हाताने परत यावं लागतं, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# 'रेल सेवा पुरस्कार २०२५'चा वितरण सोहळा उत्साहात




**नांदेड (प्रतिनिधी)**– दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागामध्ये उत्कृष्ट सेवा बजावणाऱ्या रेल्वे कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यासाठी 'रेल सेवा पुरस्कार २०२५' च्या वितरण सोहळा उत्साहात पार पडला. या सोहळ्याचे आयोजन रेल्वे इन्स्टिट्यूट, डी.ओ.सी. कॉम्प्लेक्स, हजूर साहिब नांदेड येथे करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला मंडल रेल व्यवस्थापक प्रदीप कामले, अप्पर मंडल रेल व्यवस्थापक चि. कल्याण राजू या मान्यवरांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती.

या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला. स्वागत भाषण विभागीय कार्मिक अधिकारी/समन्वय श्रीमती रसना देवी यांनी केले. यावेळी डीआरएमचे सी. एच. कल्याण राजू यांनी कर्मचाऱ्यांच्या कार्याची प्रशंसा करत सुरक्षितता, कार्यक्षमता आणि प्रवासी सेवेचे महत्त्व अधोरेखित केले.

यानंतर विभागीय रेल्वे व्यवस्थापक प्रदीप कामले यांनी आपल्या भाषणात नांदेड विभागातील कर्मचाऱ्यांच्या समर्पित कार्याचे कौतुक करीत भविष्यातीलही उत्कृष्ट कामगिरीसाठी सर्वांना प्रोत्साहित केले.

या प्रसंगी विविध विभागांतील कर्मचाऱ्यांना त्यांच्या उत्कृष्ट सेवेसाठी 'रेल सेवा पुरस्कार २०२५' प्रदान करण्यात आला. या पुरस्कारांद्वारे कर्मचाऱ्यांच्या उत्कृष्ट कार्याचा गौरव करून इतर कर्मचाऱ्यांनाही प्रेरणा देण्याचा उद्देश आहे.

केंद्रीय विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. कार्यक्रमाचा समारोप सहायक कार्मिक अधिकारी/नांदेड यांच्या आभार प्रदर्शनाने करण्यात आला.

# चंदेरी

अभिनेत्री कृतिका कामराची विशेष मुलाखत

# घर चालवणे दोघांची जबाबदारी, गौरव तितकाच हातभार लावतो!

**टीव्ही, चित्रपट आणि ओटीटी प्लॅटफॉर्मवर आपल्या अविस्मरणीय भूमिकांनी नावलौकिक मिळवलेली कृतिका कामरा लग्नानंतर नुकतीच कामावर परतली आहे. अलीकडेच प्रसिद्ध क्रिकेट होस्ट गौरव कपूरसोबतच्या साध्या विवाह सोहळ्यामुळे चर्चेत असलेली कृतिका सध्या 'मटका किंग' या ओटीटी वेब सीरिजमुळे चर्चेत आहे. या मुलाखतीत तिने तिचे काम, लग्न आणि गृहव्यवस्थापन यांसारख्या विषयांवर मनमोकळेपणाने चर्चा केली.**



कृतिका सांगते, की माझा विश्वास आहे की दोन जोडीदारांमधील मैत्री त्यांचे नाते सोपे करते. आमच्यात सुरुवातीपासूनच मैत्री होती. शिवाय आम्ही दोघेही एकमेकांच्या गोपनीयतेचा, आमच्या कामाचा आदर करतो. माझ्याप्रमाणेच गौरवही मुंबईचा नाही. आम्ही दोघेही बाहेरून आलो आणि स्वतःचे स्थान निर्माण केले. मी आणि गौरव दोघांनीही लहान वयातच काम करायला सुरुवात केली. त्याने आपली ध्येये साध्य करण्यासाठी जी मेहनत घेतली आहे, त्याचे मी मनापासून कौतुक करते. आम्हा दोघांनाही एकत्र अनेक गोष्टी करायला आवडतात, पण आमच्या कामाच्या बाबतीत आम्ही स्वतंत्र आहोत.

## लग्नानंतर फार काही बदललं नाही...

सर्वसाधारणपणे लग्नानंतर संसारात पती-पत्नीच्या भूमिका निश्चित असल्या तरी गेल्या काही वर्षांत त्या काही प्रमाणात बदलल्या आहेत. कृतिका म्हणते, की छोट्या शहरांमध्ये अजूनही पुरुषप्रधानता प्रचलित आहे. माझ्या अनेक मित्र-मैत्रिणींची लग्नं खूप वर्षांपूर्वी झाली. त्यांनाही करिअर करायचं होतं, पण ते करू शकले नाहीत. त्यांच्यापैकी काही जण आनंदी आहेत, काही नाहीत. पण मी स्वतःला भाग्यवान समजते की मला नात्यांच्या बाबतीत अशा दबावांचा कधीच सामना करावा लागला नाही. आमच्या संसारात आम्ही समान आहोत. म्हणूनच जेव्हा लोक विचारतात, की लग्नानंतर काय बदललं, तेव्हा मी म्हणते काहीच नाही. कारण आम्हा दोघांचीही स्वतःची बलस्थानं आहेत. आम्ही घर एकाच पद्धतीने चालवतो. ज्या गोष्टी तो चांगल्या प्रकारे करतो, त्या तो सांभाळतो आणि ज्या गोष्टी मी चांगल्या प्रकारे करते, त्या मी सांभाळते.

## आम्ही एकत्र घरकाम करतो...

घराच्या व्यवस्थापनाबद्दल कृतिका म्हणते, की आम्ही अनेक वर्षांपासून मुंबईत एकटेच राहत आहोत. त्यामुळे मला आणि गौरवला घर कसे चालवायचे हे माहीत आहे. उदाहरणार्थ, माझ्या मालिकेच्या प्रमोशनच्या वेळी गौरव आयपीएलच्या कामावर होता. त्यामुळे त्याची संध्याकाळची शिफ्ट होती. दुपारच्या जेवणाची तयारी तो करायचा. जेव्हा कधी तो घरी असायचा, तेव्हा तो जेवणाची व्यवस्था करायचा आणि आम्ही एकत्र मिळून काम करायचो. आम्हा दोघांनाही स्वयंपाक येतो. आता आम्ही स्वयंपाक करत नाही ही गोष्ट वेगळी. पण हे खरं आहे की आमच्या भूमिका पारंपरिक नाहीत. माझी आई नोकरी करणारी होती आणि तिला घर आणि ऑफिस दोन्ही जबाबदाऱ्या सांभाळाव्या लागत होत्या. मात्र, ज्या दिवशी मी घरी असते त्या दिवशी मी घराची काळजी घेते. घर चालवणे ही केवळ माझी जबाबदारी नाही. गौरवसुद्धा तितकाच हातभार लावतो.

## मन अन् हृदयाने होकार दिला, मग लग्न केले...

कृतिका आणि गौरव एकमेकांना खूप काळापासून ओळखत होते. लग्न कसे जुळून आले? असे विचारल्यावर ती म्हणते, की माझा विवाह संस्थेवर नेहमीच दृढ विश्वास राहिला आहे आणि मी ते कधीही हलकेपणाने घेतले नाही. मला लग्नाचे महत्त्व कळत असल्यामुळे माझा नेहमीच असा विश्वास होता की जेव्हा माझे मन आणि हृदय दोन्ही होकार देतील, तेव्हाच मी लग्नासाठी तयार असेन. प्रत्येक मुलीने असाच विचार केला पाहिजे. आम्ही लग्न करण्यासाठी भेटलो नव्हतो, पण हळूहळू आम्ही एकमेकांना ओळखू लागलो. गौरवच्या अनेक लहान लहान गोष्टी माझ्या लक्षात आल्या. गौरव आपल्या कुटुंबाला आणि मित्रांना आदर आणि प्रेम देतोच, पण अनोळखी व्यक्ती, त्याचे कर्मचारी, वृद्ध आणि मुलांशी ज्या नम्रतेने आणि प्रेमाने वागतो, त्यातून त्याचा खरा स्वभाव दिसून येतो. तो खूप आशावादी आणि नम्र आहे. तो उत्साहाने भरलेला आहे आणि मला वाटले की त्याच्यासोबत राहून माझी प्रगती होईल.

## कडक उन्हात बूफोन लूक आव्हानात्मक



टीव्हीवरून ओटीटी विश्वात पदार्पण केलेली कृतिका म्हणते, की मी टीव्ही सोडून बराच काळ लोटला आहे, पण टीव्हीवर मी जे काही काम केले आहे, त्यात मी अविस्मरणीय भूमिका साकारल्या आहेत. माझा ओटीटी प्रवास 'तांडव'ने सुरू झाला. त्यानंतर मला अनेक मोठ्या आणि चांगल्या दिग्दर्शकांसोबत काम करण्याची संधी मिळाली. नागराज मंजुळे यांची ही पहिली वेबसीरिज आहे. 'मटका किंग' वेबसिरिजमध्ये कृतिका ६०-७० च्या दशकातील लूकमध्ये दिसत आहे. ती सांगते की, मेकअप सेट करायला खूप वेळ लागला. मी याआधी अनेक मालिकांमध्ये नो-मेकअप लूक केला आहे, पण या भूमिकेत साठच्या दशकातील लूक करण्याची भरपूर संधी मिळाली. त्यामुळे खूप मजा आली. पण या लूकसाठी मला सेटवर दोन तास आधी यावे लागत असे. मला आठवतंय, आम्ही एका रेसकोर्सच्या सीनचं शूटिंग करत होतो, ज्यात माझी हेअरस्टाईल 'बुफॉन' होती. त्या लूकसाठी डोक्यावर पफ घालणे आवश्यक होते. मी टोपी आणि हातात ग्लोव्हजसुद्धा घालत असे. कडक उन्हात या लूकमध्ये शूटिंग करणे खूप आव्हानात्मक होते. आता, या भूमिकेसाठी मी एक खास हेअरस्टाईल ठेवली होती आणि शूटिंगदरम्यान ती हेअरस्टाईल टिकवून ठेवण्यासाठी मी काही प्रोजेक्ट्ससुद्धा सोडले होते, असे कृतिका म्हणाली.

अभिनेता पुलकित सम्राटची विशेष मुलाखत

# चित्रपटसृष्टीत सतत काम मिळवत राहणे सर्वांत कठीण!

**अभिनेता पुलकित सम्राट सध्या त्याच्या 'ग्लोरी' या नवीन मालिकेमुळे चर्चेत आहे. पुलकितने विशेष मुलाखतीत सांगितले की, चित्रपट हिट झाल्यावरही संघर्ष संपत नाही आणि म्हणूनच त्याला काम मागायला लाज वाटत नाही. त्याने त्याच्या संघर्षाबद्दल, 'ग्लोरी'मधील भूमिकेबद्दल मोकळी चर्चा केली...**

चित्रपटसृष्टीत करिअरला सुरुवात करताना प्रत्येकाला वाटतं, की पहिला ब्रेक मिळवणं हे सर्वात कठीण काम आहे. पण त्याहूनही कठीण गोष्ट म्हणजे काम सातत्याने मिळवत राहणं, असं पुलकित सांगतो. 'बिट्टू बॉस'मधून आपल्या चित्रपट कारकिर्दीला सुरुवात करणाऱ्या पुलकितने सुपरहिट 'फुक्रे' फ्रँचायझी, 'डॉली की डोली' आणि 'पागलपंती' यांसारख्या लोकप्रिय चित्रपटांमधून ओळख निर्माण केली आहे. पण पुलकित म्हणतो, की बॉलिवूडमध्ये काम मिळवण्यासाठी सतत कठोर परिश्रम करावे लागतात.



## 'फुक्रे' नंतरही कामाचा ओघ नाही...


पुलकितची नवीन वेब सीरिज 'ग्लोरी' ही स्वप्ने आणि महत्त्वाकांक्षांवर आधारित आहे. अशा परिस्थितीत अभिनेता बनण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी केलेल्या संघर्षाची आठवण करून देताना पुलकित म्हणतो, की इंडस्ट्रीमध्ये माझा कोणी गॉडफादर नव्हता. मला स्वतःचे स्थान निर्माण करायचे होते. पण काम मिळालं तरच तुम्ही इथे स्थान निर्माण करू शकता. पहिलं काम मिळवणं जितकं कठीण आहे. तितकंच सातत्याने काम मिळवणं हे जास्त कठीण आहे. ते मिळवण्यासाठी तुम्हाला कठोर परिश्रम करत राहावे लागतात. लोकांना स्वतःला एक 'प्रोडक्ट' म्हणून दाखवावं लागतं, असे पुलकित म्हणाला.

## काम मागण्यात काहीही लाज नाही...

सुदैवाने आज आपल्याकडे इतके प्लॅटफॉर्म आहेत, की जर एखादा कलाकार म्हणाला की त्याला काम मिळत नाहीये, तर मला नाही वाटत की त्याला काम करण्याची इच्छा आहे. कारण आज काम करण्यासाठी खूप जागा आहेत. जेव्हा मी सुरुवात केली तेव्हा असे नव्हते. आज खूप प्लॅटफॉर्म आहेत. फक्त घरातून बाहेर पडा आणि लोकांना सांगा की तुम्हाला काम हवे आहे. काम मागा, आणि ते मागण्यात काहीही लाज नाही, असे पुलकितने सांगितले.

## पाठीत लाथ बसत नाही, तोपर्यंत तुम्हाला समजत नाही...

मालिकेत पुलकित आपला राग आवरण्याचा प्रयत्न करतो. त्याने खऱ्या आयुष्यात आपल्यातील काही उणिवांवर मात केली आहे का? यावर तो म्हणाला, की माझ्यात अनेक उणिवा होत्या. एक काळ असा होता, ज्याचा मला आज अभिमान वाटत नाही. अशा अनेक गोष्टी होत्या ज्या मला हळूहळू समजल्या. जेव्हा मी घर सोडलं, एकट्याने प्रवास करू लागलो, अनेक संकटांना सामोरे गेलो, तेव्हा मला जाणवलं की जगण्याचा हा योग्य मार्ग नाही. सुरुवातीला आपल्याला फारसं काही कळत नाही. कधीकधी आपण गंमतीने कोणालातरी असं काहीतरी बोलतो, ज्यामुळे त्यांना वाईट वाटू शकतं. आज मला समजतं की, नाही मित्रा, मी तसं बोलायला नको होतं किंवा सेटवर तसं वागायला नको होतं किंवा मी ही परिस्थिती रागाशिवाय हाताळू शकलो असतो. जोपर्यंत पाठीत लाथ बसत नाही, तोपर्यंत तुम्हाला ते समजत नाही, असे स्पष्टपणे कबुली पुलकितने दिली.



## बॉक्सिंगने धडा शिकवला...

मालिकेतील बॉक्सरच्या भूमिकेच्या तयारीबद्दल पुलकित म्हणतो, की माझे पात्र एक व्यावसायिक बॉक्सर आहे. त्यामुळे मला खूप शारीरिक प्रशिक्षण घ्यावे लागले. मला बॉक्सिंग समजून घ्यावे लागले आणि जेव्हा मी प्रशिक्षण सुरू केले, तेव्हा मला जाणवले की बॉक्सिंग केवळ शारीरिक नाही; तो एक मानसिक खेळ देखील आहे. हा बुद्धिबळाच्या खेळासारखा आहे, जिथे तुम्ही रिंगमध्ये



तुमच्या प्रतिस्पर्ध्यांचे मन वाचता, त्यांची देहबोली समजून घेता आणि मी म्हणेन की बॉक्सिंगने मला तेच नियम वास्तविक जीवनात कसे लागू करायचे आणि कठीण परिस्थितींवर कशी मात करायची हे शिकवले. हो, काही ठोसे तुम्हाला नक्कीच लागतील, पण तेच ठोसे तुम्हाला ते चुकवायला आणि प्रतिहल्ला करायलाही शिकवतील, त्यामुळे मला आयुष्याबद्दल खूप काही शिकायला मिळालं. बॉक्सिंगने मला शिकवलं की केवळ शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त दिसणं पुरेसं नाही. सर्वांगीण आरोग्य महत्त्वाचं आहे, ज्याची काळजी घेणं गरजेचं आहे आणि मी ते माझ्या आयुष्यात अंमलात आणत आहे, असे पुलकितने म्हटले.

अभिनेत्री सोनम बाजवाची विशेष मुलाखत

# प्रामाणिकपणे काम केले म्हणून माझ्या चुका माफ झाल्या; इंडस्ट्रीत टिकून राहणे मोठी गोष्ट

**पंजाबी चित्रपटांमधील एक प्रसिद्ध नाव असलेली सोनम बाजवा म्हणते की, तिने तिच्या करिअरमध्ये असे काही निर्णय घेतले आहेत जे कदाचित घ्यायला नको होते. नुकतीच 'पिट्ट सियापा' या चित्रपटाच्या निमित्ताने दिल्लीत असताना सोनम बाजवाने विविध विषयांवर संवाद साधला. प्रश्नोत्तराच्या स्वरुपात तिची विशेष मुलाखत...**

» **प्रश्न : तुझा चित्रपट प्रवास खूपच रंजक राहिला आहे. तू मॉडेलिंगही केले आहे. दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीत काम केले आहे, तसेच पंजाबी आणि बॉलिवूडमध्येही काम केले आहे. तुझ्या या प्रवासाबद्दल काय सांगशील...**

**सोनम :** जेव्हा मी माझ्या प्रवासाकडे मागे वळून पाहते, तेव्हा मी कधीच कल्पना केली नव्हती की मी या टप्प्यावर पोहोचेन किंवा आयुष्यात काहीतरी मिळवेन. जेव्हा मी मागे वळून पाहते, तेव्हा मला आश्चर्य वाटते की हे सर्व कसे घडले. कारण मी सर्वच योग्य निर्णय घेतले नाहीत. जेव्हा तुमची चित्रपटसृष्टीची पार्श्वभूमी नसते, तेव्हा तुम्हाला कोणतेही प्रशिक्षण मिळालेले नसते, मार्गदर्शन करायला कोणी नसते, पाठिंबा द्यायला कोणी नसते, अशा वेळी एक चूकसुद्धा तुम्हाला खूप मागे ढकलू शकते. मला असे वाटते की मी असे अनेक निर्णय घेतले जे कदाचित घ्यायला नको होते, जिथे नाही म्हणायला हवे होते अशा अनेक ठिकाणी हो म्हटले. पण मुद्दा तोच आहे, तुम्ही तुमच्या चुकांमधून शिकता आणि पुढे जाता. त्यामुळे, मला वाटते की मी खूप समर्पण आणि प्रामाणिकपणाने काम केले आणि लोकांकडून मला प्रेम मिळत राहिले. म्हणूनच अनेक चुका माफ झाल्या. असे अनेक प्रोजेक्ट्स जे मी कदाचित करायला नको होते, ते प्रेक्षक विसरून गेले आहेत. कारण ते तुम्हाला आपलेसे मानू लागतात. इतकी वर्षे इंडस्ट्रीत टिकून राहणे ही एक मोठी उपलब्धी आहे. मी इतक्या दूर पोहोचेन याची मी कधीच कल्पना केली नव्हती. कारण मला माझा पहिला चित्रपट आठवतो. जेव्हा मला माझा पहिला चित्रपट 'बेस्ट ऑफ लक' मिळाला, तेव्हा मला वाटलं की हा माझा पहिला आणि शेवटचा चित्रपट आहे. त्यानंतर मला कोण घेणार? मला वाटलं की मला तो चित्रपट मिळाला. कारण त्यांना त्याच रात्री अभिनेत्रीचा पासपोर्ट हवा होता, नाहीतर त्यांच्या चित्रपटाच्या चित्रीकरणाला उशीर झाला असता. मी त्याच दिवशी ऑडिशनला गेले. कदाचित देवालाच वाटत होतं की मी अभिनेत्री व्हावं. मी ऑडिशनमधून नुकतीच खाली आले होते, तेव्हा ते म्हणाले, की तुमचा पासपोर्ट पाठवा. तुमची चित्रपटासाठी निवड झाली आहे.

» **प्रश्न : आज तू दिल्लीत आहेस आणि तुझं शिक्षणही दिल्लीतच झालं आहे. जेव्हा तू इथे येते तेव्हा तुला कोणत्या जुन्या दिवसांची आठवण येते?**

**सोनम :** आता मला माझ्या पीजीची (पेइंग गेस्ट रूम) आठवण येत आहे. मी दक्षिण दिल्लीत एका पीजीमध्ये राहायचे. जर मला तेव्हा कोणी सांगितलं असतं की मी नायिका होईन, तर मी कदाचित त्यांच्यावर हसले असते आणि म्हणाले असते. मी म्हणेन की आयुष्य सुंदर आणि आश्चर्यांनी भरलेले आहे. हा प्रवास सोपा नव्हता, पण मुद्दा हा आहे की जर तुमचे हेतू शुद्ध असतील, मन निर्मळ असेल आणि तुम्ही मेहनती असाल, तर यश कदाचित थोडे उशिरा मिळेल, पण ते नक्कीच मिळेल.

» **प्रश्न : 'पिट सियापा' या चित्रपटाची संकल्पना खूपच रंजक आहे. खऱ्या आयुष्यात तू कधी अशा परिस्थितीचा सामना केला आहे का?**

**सोनम :** जेव्हा तुम्ही समाजात राहता, तेव्हा कोणाच्यातरी अंत्यविधीला उपस्थित राहण्याचे प्रसंग येतातच. माझ्या बाबतीतही असे घडले आहे. मला खात्री होती की माझ्या पहिल्या चित्रपटानंतर मला कोणतेही काम मिळणार नाही. मला माहित नाही की मला 'पंजाब १९८४' कसा मिळाला,



ज्याला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. त्या चित्रपटाने केवळ माझ्या करिअरची दिशाच बदलली नाही, तर माझी विचार करण्याची पद्धतही बदलली. तिथूनच मी ठरवले की मी फक्त चित्रपटांमध्येच काम करेन. तिथून इथपर्यंतचा प्रवास मला खूप काही देऊन गेला, जो अजिबात सोपा नव्हता.

» **प्रश्न : तुझ्या चित्रपटात एक संवाद आहे ज्यात तू म्हणते की दिलजीत दोसांझ जिवंत होता, आहे आणि नेहमीच जिवंत राहील. तुम्ही 'बॉर्डर २' या चित्रपटात एकत्र कामही केले आहे. त्याच्यासोबतचा तुझा अनुभव कसा होता?**

**सोनम :** 'बॉर्डर २' हा दिलजीतसोबतचा माझा दुसरा चित्रपट होता. पहिला होता 'पंजाब १९८४'. पंजाबमधील प्रेक्षकांची मनं जिंकण्यापासून ते भारतात आणि आता जागतिक स्टार बनण्यापर्यंत, त्याचं यश अतुलनीय आहे. जेव्हा जेव्हा मी त्याच्याकडे पाहते, तेव्हा मला वाटतं की आयुष्यात नेहमी मोठी स्वप्नं बघायला हवीत, की जर हे त्याच्या बाबतीत घडू शकतं, तर माझ्या बाबतीतही घडू शकतं. दिलजीत खरंच खूप मेहनती आणि एकाग्र आहे. त्याला फक्त त्याच्या कामाची चिंता असते. तो मनाने खूप साधा माणूस आहे. केवळ पंजाबच नाही, तर संपूर्ण भारत त्याच्याकडून प्रेरणा घेतो. जेव्हा



जेव्हा मी त्याच्यासोबत काम करते, तेव्हा मी त्याच्याकडून खूप काही शिकते. तो माझ्यासाठी एक प्रेरणा आहे.

» **प्रश्न : हिंदी चित्रपटानंतर पंजाबी चित्रपटाला मिळालेल्या ओळखीमागे काय कारण आहे असं तुला वाटतं?**

**सोनम :** मी तुमच्याशी पूर्णपणे सहमत आहे की लोकांना पंजाबी खूप आवडतात. त्यांची भाषा खूप गोड आणि आपुलकीची वाटते. संगीताच्या क्षेत्रातही एखादी व्यक्ती पंजाबी नसली तरी प्रत्येकाच्या प्लेलिस्टमध्ये पंजाबी गाणं असतंच. पूर्वी लोक म्हणायचे, ही फक्त डान्सची गाणी आहेत. पण तुम्ही सतेंद्र सरताज यांची गाणी ऐकलीत तर जेव्हा ते मुंबई किंवा पुण्यात कार्यक्रम करतात, तेव्हा त्यांचे कार्यक्रम हाऊसफुल्ल होतात. अनेक पंजाबी नसलेले लोक त्यांच्या कार्यक्रमांना येतात. त्यामुळे कदाचित हा निसर्गाचा आशीर्वादच आहे की लोकांच्या मनात या भाषेबद्दल आणि संस्कृतीबद्दल इतकं प्रेम आहे. हिंदी चित्रपटसृष्टीसुद्धा बऱ्याच काळापासून पंजाबशी संबंधित कथा दाखवत आहे, त्यामुळे ते प्रेम लोकांच्या मनात टिकून आहे. पंजाबी सिनेमाची सर्वात मोठी ताकद ही आहे की तो कौटुंबिक आहे, असे सोनम म्हणाली.

# पुणे जिल्ह्यातील घटना अत्यंत निंदनीय : प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालवून आरोपीला मृत्यूदंड होईल - मुख्यमंत्री

**मुंबई (प्रतिनिधी)** - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवील यांनी पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यात एका ४ वर्षीय चिमुकलीवरील बलात्कार व हत्या प्रकरणावर तीव्र संताप व्यक्त केला आहे. पुणे जिल्ह्यातील घटना घटना अत्यंत निंदनीय व दुःखदायक आहे. या प्रकरणी सर्वांना हळहळ वाटत आहे. सरकार हे प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालवून आरोपी नराधमाला मृत्यूदंड होईल याची काळजी घेईल, असे ते म्हणालेत.

भोर तालुक्यातील नसरापूर येथे एका ६५ वर्षीय नराधमाने साडेतीन वर्षीय निष्पाप बालिकेवर लैंगिक अत्याचार करून तिची निर्घृण हत्या केली आहे. भिमराव कांबळे असे आरोपीचे नाव आहे. त्याने मृत चिमुकलीला वासरू दाखवण्याचा बहाणा करत गुरांच्या गोठ्याकडे नेले. तिथे तिच्यावर अत्याचार करून तिची दगडाने ठेचून हत्या केली. त्यानंतर तिचा मृतदेह शेणाच्या ढिगाऱ्याखाली लपवून ठेवला. या घटनेमुळे राज्यात संतापाची लाट उसळली आहे. नसरापूर येथे नागरिकांनी पुणे - सातारा महामार्गावर रास्ता रोको करून



आपला रोष व्यक्त केला. पत्रकारांनी आज याविषयी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना छेडले असता त्यांनीही या घटनेवर तीव्र संताप व्यक्त केला. मुख्यमंत्री म्हणाले, पुणे जिल्ह्यातील घटना अत्यंत निंदनीय व दुःखदायक आहे. तीन साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवर ६५ वर्षांच्या नराधमाने अत्याचार केला व खूनही केला. आरोपीला अटक करण्यात आली आहे. आरोपीचे अशा प्रकारचे जुने संदर्भही दिसत आहेत. या घटनेमुळे समाजात रोष निर्माण झाला आहे. सर्वांनाच मुलगी व तिच्या कुटुंबीयांबद्दल हळहळ वाटत आहे. मी आश्वस्त करू इच्छितो की, हे प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालवण्यात येईल.

या प्रकरणी विशेष फास्टट्रॅक कोर्ट स्थापन करण्यासाठी सरकारतर्फे हायकोर्टाला विनंती केली जाईल. तसेच स्पेशल पब्लिक प्रॉसिक्युटर देऊन कमीत कमी वेळात या नराधमाला मृत्यूदंडाची शिक्षा झाली पाहिजे अशी मागणी आम्ही कोर्टापुढे करणार आहोत. मुख्यमंत्र्यांनी यावेळी या प्रकरणाचे राजकारण करणाऱ्या विरोधकांनाही चांगलेच फटकारले. हे अत्यंत असंवेदनशील आहेत. प्रत्येक गोष्टीत राजकारण शोधून काढणे याहून अधिक वाईट काहीच असू शकत नाही. काही गोष्टीत तरी संवेदना पाळली पाहिजे. त्यांनी काही केले तरी हरकत नाही. पण राज्य सरकार जे करायला पाहिजे, ते नक्की करेन, असे ते म्हणाले.

# परीक्षा मंडळ निर्णय घेणार, आता १२वीची परीक्षा कागदावर होणार नाही?



**मुंबई (प्रतिनिधी)** - महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी-मार्चमध्ये घेण्यात आलेल्या १२ वीच्या परीक्षेचा रिझल्ट आज जाहीर झाला. राज्याचा एकूण निकाल ८९.७९ लागला असून दरवर्षीप्रमाणे कोकण विभागाचा निकाल सर्वाधिक, ९४ टक्के लागला आहे. तर लातूरचा निकाल सर्वात कमी, ८४ टक्के लागला. यंदाही मुलींनीच बाजी मारली असून ९३.१५ टक्के मुली तर ८६.८० टक्के मुलं उत्तीर्ण झाली. निकालाचं सविस्तर वाचन करतानाच बोर्डाने निकालाच्या प्रक्रियेत पारदर्शकता आणि वेग आणण्यासाठी मार्कशीटमध्ये काही बदलही केल्याचं नमूद केलं.

तसंच कागदांचा वापर मोठ्या प्रमाणात होत असल्याचे सांगत बोर्डातर्फे काही बदल होण्याचे संकेतही देण्यात आले आहेत. १२ वीची परीक्षा कागदावर घेण्यासंदर्भात बोर्ड मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत आहे. निकालाचे सविस्तर वाचन करताना बोर्डाच्या अधिकाऱ्यांशी कागदाच्या वापरबद्दलही माहिती दिली. परीक्षेसाठी जवळपास दोन हजार मॅट्रिक टन कागद वापरला. दोन हजार टन कागद वापरला जातो. मी जाणीवपूर्व किती कागद खर्च करतो हे सांगितलं. कागद हा झाडांपासून येतो. ग्लोबल वॉर्मिंग, क्लायमेट चेंज हे आपण रोज ऐकतोय. त्यामुळे आता १२ वीची परीक्षा डीजिटल घेता येईल का हे पाहावं लागणार आहे, असं अधिकाऱ्यांन नमूद केलं. २०-२० टनाचे १०० ट्रक एवढा कागद आपल्याला परीक्षेसाठी दरवर्षी लागतो. हा पर्यावरणाचा मोठा ऱ्हास आहे. त्यामुळे आता १२ वीची परीक्षा कागदावर न्वहे तर डिजीटली होण्याची शक्यता आहे. हाँ मोठा बदल लवकरत होऊ शकतो.

यापूर्वी निकालानंतर मार्कशीट दहा दिवसात मिळायची तर सर्टिफिकेट ६ महिन्याने मिळायचं. मात्र आता पहिल्यांदाच मार्कशीट आणि सर्टिफिकेट एकाच दिवशी मिळेल. म्हणजे निकाल लागल्यापासून १५ व्या दिवशी मार्कशीट आणि सर्टिफिकेट मिळणार आहे.

# देशभरात कोट्यवधी मोबाईलवर एकाच वेळी आला अलर्ट मेसेज

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** - देशभरात शनिवारी सकाळी ११:४५ वाजता अनेक मोबाईल फोनवर एकाच वेळी सायरनचा आवाज ऐकू येऊ लागला. स्क्रीनवर हिंदी-इंग्रजीमध्ये एक संदेश होता. सायरन बंद झाल्यावर मोबाईलवर संदेश वाचूनही दाखवण्यात आला. यामुळे अनेक लोक अस्वस्थ झाले, तर अनेकजण गोंधळले. मात्र, सरकारने घाबरण्याची गरज नसल्याचे सांगितले.

हा संदेश राष्ट्रीय आपत्कालीन व्यवस्थापन प्राधिकरण, जो आपत्कालीन मोबाईल अलर्ट चाचणीचा भाग आहे. 'एनडीएमए'ने आपत्कालीन परिस्थितीत लोकांपर्यंत माहिती पोहोचवण्यासाठी २ मे रोजी या सेल ब्रॉडकास्ट अलर्ट प्रणालीची चाचणी केली. 'एनडीएमए'ने मोबाईल डचड ला सेल ब्रॉडकास्ट तंत्रज्ञानाशी जोडले आहे. यामुळे निवडलेल्या परिसरात सक्रिय असलेल्या सर्व मोबाईल फोनवर एकाच वेळी अलर्ट मिळेल. यामुळे आपत्कालीन परिस्थितीत रिअल टाइम माहिती पोहोचवता येईल.

शनिवारी देशातील सर्व राज्यांच्या राजधान्यांमध्ये आणि दिल्ली-छ्उठ मध्ये सर्व मोबाईल फोनवर एकाच वेळी चाचणी संदेश पाठवण्यात आला. हा संदेश हिंदी आणि इंग्रजीसोबत सर्व प्रादेशिक भाषांमध्येही पाठवण्यात आला. या संदेशात लोकांना सांगण्यात आले की ही केवळ चाचणी आहे आणि यावर कोणतीही कारवाई करण्याची गरज नाही. सरकारने दोन दिवसांपूर्वीच मेसेज पाठवून लोकांना आवाहन केले होते की, टेस्टिंगचा मेसेज मिळाल्यास घाबरू नका. शनिवारचा मेसेज केवळ आपत्कालीन परिस्थितीत इशारा देणाऱ्या प्रणालीची तपासणी करण्यासाठी पाठवण्यात आला होता.

# शिक्षक स्नेहमिलन सोहळ्यात शिवाजीराजे पाटील यांचे व्याख्यान

**वसमत (प्रतिनिधी)** - ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या दर्जे दार तंत्रशिक्षणासाठी समर्पित जेआरडी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या वतीने रविवार ३ मे रोजी सकाळी ठिक १० वाजता माध्यमिक विद्यालयातील शिक्षकांचा भव्य स्नेहमिलन सोहळा आयोजित करण्यात आला असल्याची माहिती संस्थेचे विश्वस्त आतिष साळुंके दांडेगावकर यांनी दिली आहे.



तंत्रशिक्षण व कौशल्य विकास : काळाची गरज या विषयावर सुप्रसिध्द करिअर मार्गदर्शक तथा वीर भगतसिंग विद्यार्थी परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष इंजि शिवाजीराजे पाटील यांच्या व्याख्यानाचा शिक्षक स्नेहमिलन सोहळयाच्या निमित्ताने परिसरातील शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांना लाभणार असून कौशल्याधारित व शंभर टक्के रोजगाराच्या संधी उपलब्ध असणाऱ्या आधुनिक कोर्से ससंबधी चर्चात्मक संवाद साधण्यासाठी या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन जेआरडीआयटीच्या संचालक स्मितल दांडेगावकर, प्रा मनिषा तहाडे यांनी केले आहे.

# लाडकी बहीण योजनेतून ५४ लाख महिला बाहेर

**मुंबई (प्रतिनिधी)** - राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांना आधार देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या 'लाडकी बहीण' योजनेबाबत आता मोठी घडामोड समोर आली आहे. या योजनेतून मोठ्या प्रमाणात महिलांना वगळण्यात आल्याने लाभार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. सरकारच्या नव्या निर्णयामुळे अनेक महिलांच्या खात्यात येणारी आर्थिक मदत थांबण्याची शक्यता आहे.

या योजनेचा उद्देश कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबातील महिलांना आर्थिक सहाय्य देणे हा होता. अडीच लाख रुपयांपर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबांतील महिलांना दरमहा दीड हजार रुपये थेट बँक खात्यात जमा केले जात होते. गेल्या दोन वर्षांपासून ही योजना राज्यभरात राबवली जात आहे. त्यामुळे लाखो महिलांना याचा थेट फायदा झाला होता. मात्र, कालांतराने या योजनेत अपात्र महिलांनीही लाभ घेतल्याचे समोर आले. काही ठिकाणी सरकारी नोकरी करणाऱ्या महिलांनीही या योजनेचा फायदा घेतल्याची प्रकरणे उघड झाली होती. त्यामुळे सुरुवातीपासूनच सरकारने घालून दिलेल्या अटींचे पालन न करणाऱ्या लाभार्थ्यांवर कारवाई करण्याचा निर्णय घेतला गेला. त्यानुसार अशा महिलांना योजनेतून वगळण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली.

या पार्श्वभूमीवर सरकारने योजनेची सखोल पडताळणी करण्यासाठी केवायसी प्रक्रिया अनिवार्य केली. गेल्या दीड वर्षात अनेक टप्प्यांत ही पडताळणी करण्यात आली. केवायसी पूर्ण करण्यासाठी सरकारकडून तीन वेळा मुदतवाढ देण्यात आली होती. मात्र, ३० एप्रिलनंतर ही अंतिम मुदतही संपुष्टात आली. त्यानंतर मोठ्या प्रमाणात अपात्र लाभार्थ्यांची यादी तयार करण्यात आली.

नव्या आकडेवारीनुसार, राज्यातील सुमारे ५४ लाख महिलांना या योजनेसाठी अपात्र ठरवण्यात आले आहे. त्यामुळे या महिलांना पुढे आर्थिक मदत मिळणार नाही, असे स्पष्ट झाले आहे. तर दुसरीकडे सुमारे १ कोटी ८९ लाख महिला पात्र ठरल्या असून त्यांना दरमहा नियमानुसार १५०० रुपयांची मदत सुरूच राहणार आहे.


## टी.सी. हरवली

माझी म.शकील अहेमद म. इसरार अहेमद या नावाची बारावी पासची टी.सी. देगलूर नाका ते रेल्वे स्टेशन प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**संपर्क पत्ता.**
**म. शकील अहेमद म. इसरार अहेमद रा. आसरानगर नांदेड**
**मो. ८१४९७१२३०४**


# परळीत आता सोमवारी मांस विक्रीवर बंदी

**बीड (प्रतिनिधी)** - ऐतिहासिक निर्णय घेण्यात आलाय. परळी नगरपरिषदेने दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या भावनांचा आदर करत, हा निर्णय घेतलाय. नगराध्यक्षा पद्मश्री धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत स्थायी समितीने हा ठराव एकमताने मंजूर केला. असा महत्त्वपूर्ण निर्णय घेणारी परळी ही राज्यातील पहिलीच नगरपालिका ठरलीय.




बारा ज्योतिर्लिंगापैकी पाचवे ज्योतिर्लिंग म्हणून ओळख असलेल्या वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या भावना लक्षात घेवून दर सोमवारी मांस विक्री बंद करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय परळी पालिकेने घेतला आहे. असा निर्णय घेणारी परळी पालिका पहिली पालिका ठरली आहे. नगरपालिकेच्या स्थायी समितीने एकमताने हा ठराव मंजूर केला. नगराध्यक्षा पद्मश्री धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.या निर्णयाचे सर्वत्र कौतुक होत आहे.


**जाहिरप्रगटन**

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात,
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०३/ २०२६** पुढील तारीख - २३.०६.२०२६

अर्जदार : गंगाबाई भ्र. दत्ता गायकवाड , वय - ६५ वर्षे, व्यवसाय - शेती,
रा. गंजगांव ता. बिलोली , जि. नांदेड. .

**विरुध्द.**

गैरअर्जदारः निरंक

**विषय- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत..**

ज्याअर्थी अर्जदार ह्यांनी मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार क्रमांक ०१ हि **मयत दत्ता सयदु गायकवाड** यांचे कायदेशीर वारस आहे. अर्जदाराने कथन केले आहे की, अर्जदार हि **मयत दत्ता सयदु गायकवाड** यांची पत्नी असुन **मयत दत्ता सयदु गायकवाड** यांचा मृत्यु दिनांक ०८.०९.२०१० रोजी झाला. अर्जदाराने अर्जामध्ये असे कथन केले की, अर्जदार ह्यांना **मयत दत्ता सयदु गायकवाड** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा. न्यायालयात **सदर मयत** यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे **सदर मयत** यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर **सदर मयत** यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे **सदर मयत** यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू **सदर मयत** यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २८/०४/२०२६ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

क. लिपीक, दिवाणी न्यायालय व. स्तर., बिलोली
आदेशावरून, सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय व. स्तर., बिलोली

**जाहिरप्रगटन**

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात,
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०१/ २०२६** पुढील तारीख - १६.०६.२०२६

अर्जदार : ०१. सविता भ्र. सुरेश अलसटवार , वय - ५५ वर्षे, व्यवसाय - घरकाम,
रा. बालाजी मंदिर जवळ , बालाजी गल्ली उमरी, ता. उमरी जि. नांदेड. .
०२.कविता भ्र. किशन तिप्पनवार, वय - ४७ व्यवसाय - घरकाम ,
रा. कल्याण रोड , रुम नं. ५३७, नवी बस्ती, दांडेकरवाडी, भिवंडी ता. भिवंडी जि. ठाणे.
०३. गजानन पि. गंगाराम वासमवार , वय - ४२ वर्षे, व्यवसाय - खाजगी नोकरी,
रा. ब्राम्हण गल्ली, कुंडलवाडी, ता. बिलोली जि. नांदेड.

**विरुध्द.**

गैरअर्जदारः निरंक

**विषय- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत..**

ज्याअर्थी अर्जदार ह्यांनी मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार क्रमांक ०१ ते ०३ हे **मयत गंगाराम पि. प्रभन्ना वासमवार** यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराने कथन केले आहे की, अर्जदार क्रमांक ०१ व ०२ ह्या **मयत गंगाराम पि. प्रभन्ना वासमवार** यांच्या मुली असुन अर्जदार क्रमांक ०३ हा मुलगा आहे. **मयत गंगाराम पि. प्रभन्ना वासमवार** यांचा मृत्यु दिनांक ०७.०२.२०२६ रोजी झाला. अर्जदाराने अर्जामध्ये असे कथन केले की, अर्जदार क्रमांक ०१ ते ०३ ह्यांना **मयत गंगाराम पि. प्रभन्ना वासमवार** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा. न्यायालयात **सदर मयत** यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे **सदर मयत** यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर **सदर मयत** यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे **सदर मयत** यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू **सदर मयत** यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २८/०४/२०२६ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

क. लिपीक, दिवाणी न्यायालय व. स्तर., बिलोली
आदेशावरून, सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय व. स्तर., बिलोली

**जाहिरप्रगटन**

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात,
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९९/ २०२६** पुढील तारीख - १५.०६.२०२६

अर्जदार : ०१. लक्ष्मीबाई विश्वनाथ मेंडके , वय - ६५ वर्षे, व्यवसाय - शेती,
रा. लोहगांव ता. बिलोली जि. नांदेड.
०२. शाहूबाई हाणमंत मेंडके, वय - ३६ व्यवसाय - शेती ,
रा. लोहगांव ता. बिलोली जि. नांदेड
०३. प्रकाश विश्वनाथ मेंडके , वय - ४२ वर्षे, व्यवसाय - शेती,
रा. लोहगांव ता. बिलोली जि. नांदेड.

**विरुध्द.**

गैरअर्जदारः निरंक

**विषय- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत..**

ज्याअर्थी अर्जदार ह्यांनी मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार क्रमांक ०१ ते ०३ हे **मयत विश्वनाथ धोंडिबा मेंडके** यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराने कथन केले आहे की, अर्जदार क्रमांक ०१ हि **मयत विश्वनाथ धोंडिबा मेंडके** यांची पत्नी असुन अर्जदार क्रमांक ०२ हि **मयत विश्वनाथ धोंडिबा मेंडके** यांचा मुलगी आहे व अर्जदार क्रमांक ०३ हा **मयत विश्वनाथ धोंडिबा मेंडके** यांचा मुलगा आहे. **मयत विश्वनाथ धोंडिबा मेंडके** यांचा मृत्यु दिनांक २१.०३.२०२६ रोजी झाला. अर्जदाराने अर्जामध्ये असे कथन केले की, अर्जदार क्रमांक ०१ ते ०३ ह्यांना **मयत विश्वनाथ धोंडिबा मेंडके** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा. न्यायालयात **सदर मयत** यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे **सदर मयत** यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर **सदर मयत** यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे **सदर मयत** यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू **सदर मयत** यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २८/०४/२०२६ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

क. लिपीक, दिवाणी न्यायालय व. स्तर., बिलोली
आदेशावरून, सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय व. स्तर., बिलोली

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी, भोकर यांचे न्यायालयात**
जन्म - मृत्यू नोंदणी सुधारणा कायदा -२०२३ मध्ये कलम ११(३)अन्वये अर्ज क्रं 05
श्री. कृष्णकांत दत्तराम हाके रा. थेरबन ता. भोकर जि. नांदेड
विरुद्ध
जन्म - मृत्यू नोंदणी निबंधक तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय थेरबन ता.भोकर

विषय :- जन्म -मृत्यू नोंदणी सुधारणा कायदा २०२३ च्या कलम ११ (२) व (३) अन्वये रुक्मिणबाई मसाराव हाके यांचे मृत्युची नोंद घेण्याकरीता आदेशीत करणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार श्री. कृष्णकांत दत्तराम हाके रा. थेरबन ता. भोकर जि.नांदेड यांनी त्यांची आजी नामे श्रीमती रुक्मिणबाई मसाराव हाके यांचा मृत्यु दिनांक 11/11/2004 रोजी थेरबन ता. भोकर येथे झाला असून सदर मृत्युची नोंद जन्म -मृत्यू नोंदणी सुधारणा कायदा २०२३ च्या कलम ११ (२) व (३) अन्वये घेण्याकरीता जन्म-मृत्यू नोंदणी निबंधक तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय थेरबन ता.भोकर यांना आदेशीत करण्यासाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी श्रीमती रुक्मिणबाई मसाराव हाके यांची मृत्युची नोंद ग्रामपंचायत कार्यालय थेरबन ता.भोकर येथे उपलब्ध नाही.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबंधितास कळविण्यात येते की, अर्जदार यांची आजी श्रीमती रुक्मिणबाई मसाराव हाके यांची दिनांक 11/11/2004 रोजीची मृत्युची नोंद घेण्याविषयी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून 15 दिवसामध्ये या कार्यालयात हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. विहीत मुदतीत हजर राहून आक्षेप किंवा उजर न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारीत करण्यात येईल.

तालुका दंडाधिकारी, भोकर

## नोकरीची सुवर्णसंधी

ड्रायफ्रूट्स, टूटी फ्रूटी चेरी, आईस्क्रीमसाठी जेली तसेच मीठा पान चटणी यांच्या मार्केटिंगसाठी मेहनती व सुशिक्षित मुलांची आवश्यकता आहे.

**कामाचे ठिकाण :- नांदेड शहर व जिल्हा**
**पगार : रू. १५,००० ते रू. २०,००० पर्यंत**
बिझनेसवर आकर्षक बोनस देखील दिला जाईल
उमेदवाराकडे स्वतःचे टू-व्हीलर असणे आवश्यक आहे
**इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा:**
**फ्रेंड्स जर्दा स्टोअर, जुना मोंढा, नांदेड**
**मो. नं. ८६८८९६९७५५**

## Change In Name

MY OLD NAME IS KALINDABAI WHICH NOW I AM CHANGING AS NEW NAME KALINDABAI GOVIND GAYAKWAD MY OLD DATE OF BIRTHIS 27 OCTOBER 1955 MYCORRECT DATE OF BIRTHIS 01 JANUARY1967

ADRESS - HADOLI (J) TQ LOHA DIST NANDED (MH)431714

NOTABIAL RESISTER SRNO 556 01/05/2026

## Change In Name

My old name is QUAMARUNNISA BEGUM which now I am changing as New Name QAMRUNNISA BEGUM henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the same.

R/O. 1-13-317, PEER BURHAN NAGAR GALLI NO 09, NANDED-431605

Mob No. :- 7507591137

## Change In Name

My Old Name is " MOHAMMED MAJID AHMED HUSSAIN" which now I am changing as New Name " MOHAMMED MAJID HUSSAIN". Hence forth my all Correspondence will be done as per my new name. Please Consider the Same. MOHAMMED MAJID HUSSAIN

Address : 697, SUMAYA NAGAR, NEAR B & C COLONY, TARODA B.K. NANDED, NANDED, MAHARASHTRA PINCODE:-431605 Mob. No.-9890331337

## Change In Name

My Old Name is " AMTUL HASEEB" which now I am changing as New Name " AMATUL HASEEB". Hence forth my all Correspondence will be done as per my new name. Please Consider the Same.

AMATUL HASEEB

Address : 697, SUMAYA NAGAR, NEAR B & C COLONY, TARODA B.K. NANDED, NANDED, MAHARASHTRA PINCODE:-431605 Mob. No.- 9890331337

## Change In Name

My old name is EZAZ MUSAVVIR SABILA which now I am changing as New Name EZAZ MUSAVVIR SABEELA henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the same.


R/O. 1-13-317, PEER BURHAN NAGAR GALLI NO 09, NANDED-431605

Mob No. :- 7507591137

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::
**सेवा क्लिनीक**
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -६
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७७१७०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



## जिल्हा न्यायालयाच्या इतिहासात प्रथमच प्ली बार्गेनिंगद्वारे न्याय निर्णय; २११ दिवस तुरुंगातील कारावास ग्राह्य धरून निकाल

**नांदेड (प्रतिनिधी)** –महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांसोबत हुज्जत घालणाऱ्या एकाला २११ दिवस तुरुंगात कारावास भोगावा लागला. हे लक्षात घेता व आरोपीची आर्थिक परिस्थिती विचारात घेता तुरुंगात भोगलेला कालावधी हीच शिक्षा गृहीत धरून न्यायाधीश पी. एस. सोलनकर यांनी शनिवार, दि. २ मे रोजी न्यायनिवाडा दिला. प्ली बार्गेनिंगच्या निकालाची ही जिल्ह्याच्या न्यायालयीन इतिहासातील पहिली घटना असल्याचे बोलले जाते. या बाबीमुळे काही मोजक्या सत्र खटल्यामध्ये सुध्दा प्ली बार्गेनींग घडवून आणता येवू शकतो, ही बाब यशस्वीरित्या करुन दाखविण्यात आली.

सत्र खटला क्र.४४/२०२० दि. ११ डिसेंबर २०१९ रोजी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास फिर्यादी महाराष्ट्र राज्य वीज वितरण ऑफिसमधून मेंटेनन्सचे काम पाहण्यासाठी जात असताना अनिल गणेश आठवले रा. इंदिरानगर, बारड ता. मुदखेड याने त्याच्या घरचे विद्युत मिटर का बसवले नाही या कारणावरून फिर्यादी करीत असलेल्या शासकीय कामात अडथळा निर्माण करून फिर्यादीस शिवीगाळ करून मारहाण केली. या मारहाणीत त्यांना डाव्या हातास व उजव्या पायाचा अंगठ्यास जबर दुखापत झाली.

यावरून बारड पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ६९/२०१९ नुसार भा.दं.वि.चे कलम ३५३, ३३२, ५०४, ५०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपास बारड पोलीस ठाण्याचे तत्कालीन सहायक पोलीस निरीक्षक नितीन खंडागळे यांनी पूर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. तत्पूर्वी त्यांनी आरोपीला अटक करून न्यायालयीन कोठडीत पाठवले होते. सदर प्रकरणात आरोपी हा न्यायाधीन बंदी असल्याने न्यायालयात आरोपीतर्फे उपमुख्य न्यायरक्षक विधीज्ञ एच. व्ही. संतान यांनी प्ली बार्गेनिंगचा अर्ज कलम २६५ सी.आर.पी.सी. नुसार दाखल केला. त्यावरुन न्यायालयाने फिर्यादी व सरकार पक्षास आपले म्हणणे सादर करण्याचे निर्देश दिले. त्याअनुषंगाने सरकार पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता पी. व्ही. बुलबुले व फिर्यादीने त्यांचे म्हणणे न्यायालयासमक्ष सादर केले. त्यानंतर उभयपक्षांची ईन कॅमेरा सुनावणी झाल्यानंतर न्यायालयाने प्ली बार्गेनिंगचा अहवाल तयार करुन त्यानुसार न्यायनिर्णय जाहीर केला. त्यामध्ये आरोपीस भा.दं. वि.चे कलम ३५३, ३३२, ५०४, ५०६ या कलमा अंतर्गत आरोपीने आतापर्यंत एकूण भोगलेला तुरुंगवास (२११ दिवस) लक्षात घेता व आरोपीची आर्थिक परिस्थिती विचारात घेऊन भोगलेला तुरुंगवास हिच शिक्षा गृहीत धरुन कलम २६५ (एफ) सी.आर.पी.सी प्रमाणे न्यायनिवाडा दिला. या सर्व न्यायालयीन प्रक्रियेमध्ये जिल्हा विधीसेवा प्राधिकरणाचे सचिव तथा न्यायाधीश शरद देशपांडे, सहायक संचालक शोभा सबनीस (देशमुख), जिल्हा सरकारी वकील रणजीत देशमुख यांचे सहकार्य लाभले.

नोडल ऑफीसर पोलीस उपनिरीक्षक नईम खान यांच्या मार्गदर्शनाखाली कोर्ट पैरवी कर्मचारी म्हणून बारड पोलीस ठाण्याची महिला अंमलदार रुपाली कळणे यांनी कामकाज पाहिले.

## शहरातील जुगार अड्ड्यांवर ‘एलसीबी’ची धाड; १८ जणांवर गुन्हा



**नांदेड (प्रतिनिधी)**– ‘ऑपरेशन क्रेकडाऊन’ अंतर्गत मोठी कारवाई करीत गुरुवार, दि. ३० एप्रिल रोजी शहरातील तीन ठिकाणी अवैध मटका व जुगार अड्ड्यांवर कारवाई केली. या कारवाईत १८ जुगाऱ्यांविरोधात गुन्हे दाखल करून एकूण ५५ हजार ४६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ही कारवाई केली.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांना मिळालेल्या माहितीवरून त्यांच्या पथकाने पोलीस ठाणे नांदेड ग्रामीण, इतवारा, शिवाजीनगर येथील वेगवेगळ्या ठिकाणी सुरू असलेल्या अड्ड्यांवर कारवाई केली. याप्रकरणी अनुक्रमे गुन्हे क्रमांक ४८३/२०२६, १३८/२०२६ व १८७/२०२६ (कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार अधिनियम) अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले.

शहरातील शिवाजीनगर येथील दातार चौक परिसरातील पान टपरीजवळ मटका खेळताना चार जणांना रंगेहात पकडण्यात आले. त्यांच्याकडून २४ हजार ५६० रुपयांचा मुद्देमाल (रोख, जुगाराचे साहित्य, मोबाईल) जप्त करण्यात आला. या अड्ड्याचा मूळ सूत्रधार शेख मुजाहीद शेख अहमदमिया (सिध्दनाथपुरी, चौफाळा) याच्याविरोधातही गुन्हा दाखल करण्यात आला. जप्त मुद्देमालामध्ये रोख रक्कम, पत्ते, मोबाईल फोन तसेच जुगारासंबंधी इतर साहित्याचा समावेश आहे. पोलीस उपनिरीक्षक नागनाथ तुकडे, महेश कोरे, मिलिंद सोनकांबळे, दारासिंग राठोड यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखेच्या अंमलदारांनी ही कारवाई केली.

या कारवाईत रमाकांत विठ्ठल जमदाडे, राहुल भीमराव चौंदंते, मोहम्मद असलम मोहम्मद अहेमदमियाँ, मोहम्मद नजफअली मोहम्मद याकुबअली, गौतम अशोक हातवळणे, शेख मुजाहीद, दिलीप अमरचंद चौधरी, संतोष सुभाष कडपे, कन्हैया यादव, रवी शिंदे, मोहम्मद अल्पेकरार, शेख सफदर, सय्यद अन्वर सय्यद उमर, राजू, अमेर खॉन सादीक खॉन, दत्ता, शेख युनूस शेख युसूफ, अब्दुल अब्बास गफुर यांना अटक करण्यात आली आहे.

## शेतकऱ्यांनी रेल्वे रुळांजवळ पिकांचे अवशेष जाळणे टाळण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)** – विभागातील ढेंगळी पिंपळगाव-मानवत रोड या रेल्वे मार्गाच्या २५७/८२ किमी अंतराच्या परिसरात काल आगीची एक घटना निदर्शनास आली. ही आग रेल्वे रुळांपासून काही अंतरावर असल्याने आणि त्यामुळे रेल्वे वाहतुकीला कोणताही तत्काळ धोका निर्माण झाला नसला तरी, रेल्वेच्या महत्त्वाच्या पायाभूत सुविधांकडे ही आग पसरण्याचा संभाव्य धोका मात्र कायम होता.

स्थानिक प्रशासन, ग्राम प्रतिनिधी आणि रेल्वे सुरक्षा दलाचे जवान यांच्या समन्वयाने यावर तत्काळ कार्यवाही करण्यात आली. आग आटोक्यात आणण्यासाठी आणि ती विझवण्यासाठी त्वरित प्रयत्न सुरू करण्यात आले. या रेल्वे मार्गावरील गाड्यांची वाहतूक मात्र विनाअडथळा सुरू राहिली. प्राथमिक निरीक्षणांवरून असे दिसून येते की, जवळच्या शेतजमिनींमध्ये पिकांचे अवशेष जाळल्यामुळे ही आग लागली असावी.

**जनतेसाठी महत्त्वाचे आवाहन**

रेल्वे रुळांजवळ पिकांचे अवशेष किंवा शेतातील कचरा जाळू नका. अशा प्रकारच्या आगी वाऱ्यामुळे वेगाने पसरू शकतात आणि त्यामुळे ओव्हरहेड इक्विपमेंट (रेल्वेच्या वरून जाणारी विद्युत तार यंत्रणा), सिग्नल यंत्रणा, रेल्वेची मालमत्ता आदी बाबींचे गंभीर नुकसान होऊ शकते.

रेल्वे अधिनियम १९८९ च्या कलम १५३ नुसार, जी कोणतीही व्यक्ती जाणूनबुजून केलेल्या कृतीमुळे, निष्काळजीपणामुळे किंवा कर्तव्यातील कसुरीमुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेला किंवा रेल्वेच्या कामकाजाला धोका निर्माण करते किंवा तसा धोका निर्माण होण्याची शक्यता निर्माण करते, ती व्यक्ती कठोर शिक्षेस पात्र ठरते. वाऱ्यामुळे आणि कोरड्या वातावरणामुळे आग वेगाने पसरू शकते. ओव्हरहेड इक्विपमेंट, सिग्नल केबल्स आणि रुळांच्या कडेला उभारलेल्या इतर सुविधांसारख्या रेल्वेच्या महत्त्वाच्या मालमत्तेचे नुकसान होऊ शकते. गंभीर अपघात घडण्याची किंवा रेल्वे सेवा विस्कळीत होण्याची शक्यता निर्माण होऊ शकते, तेव्हा शेतकऱ्यांनी याविषयी जागरूक राहावे, असे कळविण्यात आले आहे.

## ‘महाराष्ट्र उद्योग रत्न २०२६’ पुरस्काराने गोदावरी अर्बनचा गौरव



**नांदेड (प्रतिनिधी)** –सहकार व आर्थिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत नवे विक्रम प्रस्थापित करणाऱ्या गोदावरी अर्बनला महाराष्ट्र शासन पुरस्कृत महाराष्ट्र उद्योग रत्न २०२६ या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नाशिक येथे आयोजित समारंभात सुप्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्या हस्ते गोदावरी अर्बनचे सचिव ॲड. रविंद्र रगटे व उपसरव्यवस्थापक रवी इंगळे तथा चतुर्थ श्रेणी कर्मचारी वर्गातून सर्वोत्कृष्ट उदिष्टपूर्ती करणारे भूषण काळमेघ यांनी हा मानाचा पुरस्कार स्वीकारला.

आर्थिक तसेच सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. ३१ मार्च २०२६ रोजी समाप्त झालेल्या आर्थिक वर्षात गोदावरी अर्बनने आपल्या कार्यक्षेत्रातील सहा राज्यांमध्ये विविध शाखांच्या माध्यमातून तब्बल ३०७९ कोटी रुपयांच्या ठेवींसह विक्रमी ५५५५ कोटी रुपयांचा व्यवसाय नोंदवत सहकार क्षेत्रात नवा उच्चांक प्रस्थापित केला आहे. विशेष बाब म्हणजे, यापूर्वी २०२३ मध्ये हाच प्रतिष्ठेचा पुरस्कार उद्योगविश्वातील दिग्गज रतन टाटा यांना प्रदान करण्यात आला होता. त्यामुळे या पुरस्काराची प्रतिष्ठा आणि विश्वासार्हता अधिक अधोरेखित झाली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल गोदावरी अर्बनचे संस्थापक तथा विधान परिषद गटनेते आमदार हेमंत पाटील, अध्यक्ष राजश्री पाटील यांनी व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर तसेच समस्त संचालक मंडळाचे अभिनंदन केले.

## नारीशक्ती वंदन अधिनियमावर आ. श्रीजया चव्हाण यांचे सादरीकरण




**नांदेड (प्रतिनिधी)** –भारतीय जनता पार्टी नांदेड महानगरच्या आढावा बैठकीत आ. श्रीजया चव्हाण यांनी ‘नारीशक्ती वंदन अधिनियमावर’ विशेष सादरीकरण केले. यावेळी त्यांनी लोकसभा आणि विधानसभेत महिलांना आरक्षण देण्याबाबत २०२३ मध्ये संसदेत मंजूर झालेल्या ऐतिहासिक कायद्यावर सविस्तर भाष्य केले.

महिला आरक्षण २०२९ च्या लोकसभा निवडणुकीपासून लागू करण्यासंदर्भात एप्रिल २०२६ मध्ये संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्यात आले होते. या अधिवेशनातील विधेयके आणि केंद्र सरकारचे प्रामाणिक प्रयत्न, तसेच विरोधकांनी घेतलेल्या भूमिकेमुळे महिला आरक्षणाच्या अंमल-बजावणीत झालेला विलंब, या सर्व तांत्रिक व राजकीय पैलूंवर त्यांनी विस्तृत ऊहापोह केला. याच बैठकीत भाजप नांदेड महानगरचे माजी अध्यक्ष प्रवीण साले यांनी मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पुनरावलोकन प्रक्रियेबाबत उपस्थितांना सविस्तर माहिती दिली.

## नांदेड शहरासह देगलूरच्या मटका अड्ड्यांवर धाड

**नांदेड (प्रतिनिधी)**– पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेने अवैध धंद्याविरुद्ध कारवाईचे सत्र सुरु केले आहे. शुक्रवारी नांदेड व देगलूर येथील मटका अड्ड्यांवर धाडी टाकून मटकाकिंगसह बारा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्या आदेशावरून सहायक पोलीस निरीक्षक वसंत आरसेवार व पोलीस कर्मचाऱ्यांनी शुक्रवार, दि.१ मे रोजी भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कल्याणनगर भागात सुरु असलेल्या मटका अड्ड्यावर छापा टाकला. मटका घेणाऱ्या तीन जणांना अटक करुन त्यांच्याकडून मटका घेण्याचे साहित्य व रोख रक्कम ४३ हजार रुपये जप्त करण्यात आले. सदरील मटका हा मटकाकिंग अनवर अलीखान अकबर अलीखान रा. खडकपुरा, कमल यादव रा. वजिराबाद, वेणू कांबळे व रोहन कांबळे हे घेत होते. तसेच स्थानिक गुन्हे शाखेच्या दुसऱ्या पथकाने पोलीस उपनिरीक्षक नागनाथ तुकडे यांच्या नेतृत्वाखाली देगलूर शहरातील रोहीदास चौकात टीन शेडमध्ये सुरु असलेल्या मटका अड्ड्यावर धाड टाकून दोघांना अटक केली. त्यांच्याकडून मटका घेण्याचे साहित्य व रोख २५ हजार ५७० रुपये जप्त करण्यात आले.

या प्रकरणी पोलिसांनी शेख इस्माईल शेख मुनीर रा. मातुळ ता. भोकर, धम्मदीप थोरात रा. वारंगा फाटा, विठ्ठल जळबाजी कोल्हे रा. कासारखेडा, अनवर अलीखान अकबर अलीखान रा. खडकपुरा नांदेड, कमल यादव रा. वजीराबाद नांदेड, वेणू कांबळे, रोहन कांबळे रा. कल्याणनगर, नांदेड, केशव लक्ष्मण चिद्रावार, रा. लाईनगल्ली देगलूर, शैलेश सुभाषराव पांडलवार रा. भोईगल्ली, देगलूर, सुभाष थडके, बालाजी थडके रा. देगाव ता. देगलूर, संतोष नईनवाड रा. शिवनेरीनगर, देगलूर यांच्या विरुध्द भाग्यनगर व देगलूर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले.

## पीआय संजीवन मिरकलेसह अन्य अमलदार सेवानिवृत्त



**नांदेड (प्रतिनिधी)** –जिल्हा पोलीस दलात कार्यरत असलेले व नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले संजीवन मिरकलेंसह अन्य पोलीस अंमलदारांना पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली निरोप देण्यात आला.

निरोप समारंभास अतिरिक्त पोलीस अधीक्षक सूरज गुरव यांच्या हस्ते निवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रम मंथन हॉल येथे संपन्न झाला.

संजीवन विठ्ठलराव मिरकले, संजय शंकरराव चिटसावर, श्रीमंत आठवले, साहेबराव आलू आडे, माधव मनोहरराव पळसवाड, शेख अहमद कालेजी, किशन दिगांबर केंद्रे, सुभाष मारोती हमदे, शिवाजी विश्वनाथ सूर्यवंशी, साजेदअली विलायकतअली सय्यद आणि भास्कर संभाजी केंद्रे यांचा समावेश आहे.

पोलीस अधीक्षकांनी आपल्या मनोगतात निवृत्त कर्मचाऱ्यांनी आरोग्याची काळजी घेत कुटुंबासोबत आनंदी जीवन व्यतीत करावे, असा सल्ला दिला. उपस्थित अधिकारी व अंमलदारांनी निवृत्त सहकाऱ्यांच्या कार्याचा गौरव करत त्यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला पोलीस अधिकारी, कर्मचारी तसेच पोलीस कल्याण विभागाचे पोलीस निरीक्षक जगदीश मंडलवार यांच्यासह सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

## नांदेड विभाग मध्य रेल्वेला जोडा; खा. अशोकराव चव्हाण यांची मागणी

### रेल्वे मंत्री आणि मुख्यमंत्र्यांशी दूरध्वनीवरून चर्चा

**नांदेड (प्रतिनिधी)** –भारतीय रेल्वेने ‘दक्षिण तटीय रेल्वे’ या नवीन झोनची निर्मिती प्रक्रिया सुरू केली असून, त्या पार्श्वभूमीवर नांदेड रेल्वे विभाग ‘मध्य रेल्वे’ला जोडण्याची आग्रही मागणी माजी मुख्यमंत्री व खासदार अशोकराव चव्हाण यांनी केली आहे.

या संदर्भात त्यांनी रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सविस्तर पत्र पाठवून त्यानंतर दूरध्वनीद्वारे चर्चा केली. दक्षिण तटीय रेल्वे झोनच्या निर्मितीनंतर दक्षिण मध्य रेल्वेतील सध्याच्या सहा विभागांपैकी तीन विभाग नवीन झोनमध्ये समाविष्ट केले जाणार आहेत, तर नांदेडसह उर्वरित तीन विभाग दक्षिण मध्य रेल्वेकडेच कायम ठेवण्याचे प्रस्तावित आहे. मात्र, महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, सोलापूर, भुसावळ आणि नागपूर हे पाचही विभाग मुंबई मुख्यालय असलेल्या ‘मध्य रेल्वे’ झोनमध्ये असताना केवळ नांदेड विभागच सिकंदराबाद मुख्यालय असलेल्या ‘दक्षिण मध्य रेल्वे’त असणे असंयुक्तिक असल्याचे खा. चव्हाण यांनी निदर्शनास आणून दिले.

खा. अशोकराव चव्हाण यांनी पत्रात खंत व्यक्त केली की, दक्षिण मध्य रेल्वेकडून नांदेड विभागाला समन्यायी वागणूक मिळत नाही. भौगोलिक, भाषिक व प्रशासकीय सुलभतेच्या दृष्टिकोनातून नांदेड विभाग मध्य रेल्वे झोनच्या अंतर्गत असणेच संयुक्तिक आहे. दक्षिण मध्य रेल्वेकडून नांदेड विभागातील उड्डाणपूल, भुयारी मार्ग आणि स्थानकांतील मूलभूत सुविधांची कामे वेळेवर केली जात नाहीत. शिवाय, रेल्वेचे वेळापत्रकही प्रामुख्याने तेलंगणातील प्रवाशांच्या सोयीनुसार ठरवले जात असल्याने मराठवाड्यातील प्रवाशांना मोठा फटका बसत आहे. नांदेड विभाग मध्य रेल्वेला जोडण्याची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित असून, त्यासाठी अनेक लोकप्रतिनिधींनी निवेदने दिलेली आहेत. सध्या होत असलेल्या झोनच्या विभाजनामुळे ही बहुप्रतिक्षित मागणी पूर्ण करण्याची हीच योग्य वेळ असल्याचे खा. चव्हाण यांनी यावेळी सांगितले.

## कौठा येथे मंडप डेकोरेशनच्या गोदामाला आग; लाखोंचे नुकसान



**नांदेड (प्रतिनिधी)** –कौठा येथील मुख्य रस्त्यालगत असलेल्या एका मंडप डेकोरेशनच्या गोदामाला आग लागल्यामुळे लाखोंच्या मालमत्तेचे नुकसान झाले आहे. सदर घटना १ मे रोजी रात्री घडली.

नवीन कौठा परिसरातील मुख्य रस्त्यालगत असलेल्या बापूराव नागोराव खिचडे यांच्या मालकीच्या शिवशंकर मंडप डेकोरेशन गोदामाला भीषण आग लागली. या आगीमध्ये लाखो रुपयांचे मंडप डेकोरेशनचे साहित्य जळून खाक झाले. घटनेची माहिती मिळताच मनपाच्या अग्निशमन दलाच्या पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन आग आटोक्यात आणली. त्यामुळे पुढील अनर्थ टळला आहे. शॉर्टसर्किटमुळे ही आग लागली असावी असा अंदाज वर्तवला जात असून, या घटनेबाबत ग्रामीण पोलीस ठाण्यामध्ये नोंद करण्यात आली आहे. मात्र सदर आग कोणत्या कारणाने लागली हे स्पष्ट झाले नव्हते. घटनास्थळी तत्काळ अग्निशमन दलाच्या जवानांनी आग विझविण्यासाठी प्रयत्न केले.

## किनवट शहरात स्वगणनेला प्रारंभ




**किनवट (प्रतिनिधी)** – भारत सरकारचा महत्त्वपूर्ण उपक्रम असलेल्या जनगणना २०२७ अंतर्गत नगरपरिषदेच्यावतीने किनवट शहरात दि. १ मे रोजी स्वगणना प्रक्रियेला उत्साहात प्रारंभ करण्यात आला. या मोहिमेची सुरुवात नगराध्यक्षा सौ. सुजाता यंड्रलवार यांच्यापासून करण्यात आली.

यावेळी नगराध्यक्षांनी स्वतः स्वगणना करून नागरिकांना या प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. स्वगणनेचा कालावधी दि.१ ते १५ मे असून, या कालावधीत नागरिकांनी https://se.census.gov in या लिंकवर जाऊन स्वतःची माहिती भरू घ्यावी. स्वगणना ही नागरिकांनी स्वतः अचूक माहिती नोंदविण्याची सुलभ व आधुनिक पद्धत असून, त्यामुळे जनगणना प्रक्रिया अधिक जलद, पारदर्शक व परिणामकारक होणार आहे.

याप्रसंगी मुख्याधिकारी मुगाजी काकडे यांच्यासह पालिका पदाधिकारी, सदस्य तसेच कर्मचारी उपस्थित होते. नागरिकांना स्वगणनेची प्रक्रिया, त्याचे महत्त्व तसेच अचूक माहिती देण्याबाबत यावेळी मार्गदर्शन करण्यात आले.

स्वगणना प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेऊन अचूक व प्रामाणिक माहिती नोंदवावी, असे आवाहन पालिकेने केले आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com